# महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

एमएमटीसी हाऊस, पाचवा मजला ई ब्लॉक , सी २२, वांद्रे- कुर्ला संकुल, वांद्रे (पुर्व),मुंबई ४०० ०५१

संकेतस्थळ- www.mahabocw.in
दुरध्वनी व फॅक्सक्र. ०२२-२६५७२६३१
ई-मेल bocwwboardmaha@gmail.com

जावक क्र. ७५१ /२०२४
आरोग्य-२०२४/प्र.क्र.३५/योजना-०६ दिनांक:- 24 JUL 2024

## कार्यारंभ आदेश

प्रति,
व्यवस्थापक,
मे.एच एस सी सी (इंडिया) लिमिटेड,
ई-६ (ए), सेक्टर-१,
नौएडा (उ. प्र.)-२०१३०१

**विषय :- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई अंतर्गत नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगार व कुटुंबिया यांचेकरीता BOMT (Build Operate Manage Transfer) या तत्वावर रूग्णालय उभारणीव्दारे "तपासणी ते उपचार आरोग्य योजना" राबविण्याबाबतचा कार्यारंभ आदेश.**

**संदर्भ** :-
१. शासन निर्णय, उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्र. इबांका-२०२३/प्र.क्र७७/कामगार-७ दि.०७.०८.२०२३
२. शासन शुध्दीपत्रक उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. इबांका-२०२३/प्र.क्र.७७/कामगार-०७ दि.०९.०१.२०२४
३. एचएससीसी (इंडिया) लिमिटेड (भारत सरकार उद्योग) यांचा प्रस्ताव क्र. /बीडी/महाराष्ट्र/२०२४-२५/०९, दि.०६.०६.२०२४
४. मंडळाचे पत्र क्र. आरोग्य-२०२४/प्र.क्र.३५/योजना-०६/६१८/२०२४ दि.१०.०७.२०२४
५. उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचे पत्र क्र. इबांका-२०२३/प्र.क्र.७७ (भाग-१) /काम-७ दि.१०.०७.२०२४
६. मंडळाचे पत्र क्र. आरोग्य-२०२४/प्र.क्र.३५/योजना-०६/६४९/२०२४ दि.१२.०७.२०२४
७. शासन निर्णय, उद्योग, उर्जा, कामगार व खनिकर्म विभाग क्र. इबांका-०५२३/प्र.क्र.७७ (भाग-१)/कामगार-७ दि.१२.०७.२०२४
८. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई व एचएससीसी (इंडिया) लिमिटेड (भारत सरकार उद्योग) यांच्यातील विषयाकित प्रकरणी करण्यात आलेला करारनामा दि.१८.०७.२०२४

**महोदय,**

मंडळाकडील नोंदीत (सक्रिय) जीवित बांधकाम कामगारांची व त्यांचेवर अवलंबित कुटुंबामधील यथास्थिती पती/पत्नी आणि त्यांची १० वर्षावरील २ अविवाहीत अपत्ये यांचेकरीता एचएससीसी (इंडिया) लिमिटेड (भारत सरकार उद्योग) BOMT (Build Operate Manage Transfer) तत्वावर रूग्णालय उभारणीव्दारे संदर्भ क्र. ०१ ते ०७ अन्वये शासन मान्यता प्राप्त झाली आहे. त्यानुसार संदर्भ क्र. ०८ अन्वये मंडळ व एचएससीसी (इंडिया) लिमिटेड (भारत सरकार उद्योग) यांच्यामध्ये सदर प्रकरणी दि.१८.०७.२०२४ रोजी करारनामा करण्यात आला असून त्यानुसार खालील नमूद अटी व शर्तीना अधिन राहून कार्यारंभ आदेश देण्यात येत आहेत.

**(१) सदर योजनेचे लाभार्थी खालीलप्रमाणे राहतील -**

(१) मंडळाकडील नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगार तसेच, त्यांच्या कुटुंबामधील पती अथवा पत्नी व १० वर्षावरील प्रथम दोन अपत्ये ही लाभार्थी म्हणून गणण्यात येतील. तथापि, संबंधित बांधकाम कामागारांची १० वर्षाखालील २ अपत्ये अपघात अथवा इतर आजारपणाकरीता रूग्णालय भरती व औषधोपचारास पात्र राहतील मात्र त्यांना प्राथमिक आरोग्य तपासणी चाचणी अनुज्ञेय राहणार नाही.

(२) सदर योजनेअंतर्गत बांधकाम कामगारांच्या सक्रीय (जिवीत) नोंदणी कालावधीमध्ये वर्षातुन एकदा सदर योजनेच्या लाभासाठी लाभार्थी पात्र राहतील.

सदर योजनेच्या लाभाची संबंधित बांधकाम कामगारास त्याच्या नोंदणी कालावधीमध्ये व्दिरूक्ती होणार नाही याची विभागीय कार्यालय व जिल्हा कार्यालय तसेच एचएससीसी (इंडिया) लिमिटेड (भारत सरकार उद्योग) यांनी दक्षता घ्यावी. कोणत्याही टप्प्यावर व्दिरूक्ती आढळल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी सेवा पुरवठादार संस्थेची राहील व त्यांचेकडून झालेल्या खर्चाची वसूली करण्यात येईल.

(३) "महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई" अंतर्गत नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगाराने सार्वजनिक आरोग्य विभागाची "महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना" अथवा कामगार विभागाची "तपासणी ते उपचार" आरोग्य योजना या दोन योजनांपैकी एक योजना निवडण्याचा विकल्प द्यावा. बांधकाम कामगारास दोन्ही योजनांचा लाभ घेता येणार नाही. एकदा बांधकाम कामगाराने पर्याय निवडल्यास त्याच योजनेंतर्गत लाभ घेणे बंधनकारक ठरेल.

(४) उपरोक्त नमूद केल्यानुसार बांधकाम कामगाराने सार्वजनिक आरोग्य विभागाची **"महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजना " अथवा कामगार विभागाची " तपासणी ते उपचार " आरोग्य योजना** या दोन योजनापैकी एक योजना निवडण्याचा

विकल्प बांधकाम कामगारास असल्याने व त्यास दोन्ही योजनांचा लाभ घेता येणार नसल्याने संबंधित संस्थानी बांधकाम कामगार नोंदीत जिवित (सक्रीय) उपचाराकरीता रुग्णालयांत दाखल झाल्यास नोंदणी जिवित असल्याची खात्री करण्यासोबतच दुबार लाभ टाळण्याकरीता बांधकाम कामगाराकडे आयुष्यमान भारत योजनेअंतर्गत देण्यात येणाऱ्या कार्डव्दारे (आभा कार्ड) बांधकाम कामगाराने महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजने अंतर्गत लाभ घेतला नसल्याचे तपासता येईल. भविष्यात दुबार लाभ टाळण्याकरीता संबंधित संस्थेने एखादया बांधकाम कामगाराकडे आभा कार्ड नसल्यास ते उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी संबंधित संस्थांची राहील.

(५) सदरची योजना मंडळाकडील नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगार व त्यांचेवरील अवलंबित अनुज्ञेय कुटुंबियाकरीता ऐच्छिक स्वरूपाची राहील.

**(२) सदरची योजना खालील तीन टप्यामध्ये राबविण्याची आहे.**

**(अ)** प्राथमिक आरोग्य तपासणी चाचणी

**(ब)** प्रगत पुष्ठीकरण आरोग्य तपासणी चाचणी

**(क)** वैद्यकीय उपचार

**(अ) प्राथमिक आरोग्य तपासणी चाचणी**

अ.१- तपासणी पुर्व आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन (Pre-Health Camp)-

सेवा पुरवठादार संस्था, जिल्हा कामगार सुविधा केंद्राचे प्रमुख कामगार उपायुक्त/सहायक कामगार आयुक्त/सरकारी कामगार अधिकारी यांच्या मान्यतेने तपासणी पुर्व आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन करण्यासाठी ठिकाणे, दिनांक व वेळ निश्चीत करण्याची आहे.

**अ.२- आरोग्य तपासणी शिबीरातील उपक्रम**

अ.२.१ सेवा पुरवठादार संस्थेने शिबीराकरीता निश्चीत केलेल्या लाभार्थ्यांना एकत्रीत करून त्यांची नोंदणी करण्याची आहे.

अ.२.२ सेवा पुरवठादार संस्थेने शिबीरामध्ये आवश्यकतेनुसार डॉक्टर व वैद्यकीय सहायक उपलब्ध करून देण्याची आहे.

अ.२.३ सेवा पुरवठादार संस्थेकडून शिबिरामध्ये लाभार्थ्यांची शारीरिक तपासणी करण्याची आहे व त्यांच्या पूर्व आजार तथा वैद्यकीय इतिहासाची माहिती नोंदविण्याची आहे

अ.२.४ शिबिरामध्ये सेवा पुरवठादार संस्थेमार्फत लाभार्थ्यांच्या तपासणीसाठीचे नमुने (Samples) गोळा करण्याचे आहेत

अ.२.५ बांधकाम कामगारांच्या करावयाच्या प्राथमिक आरोग्य तपासणी चाचण्या या वरील नमूद शिबिरामध्ये अथवा बांधकाम कामगारांच्या घरोघरी जाऊन सेवा पुरवठादार

संस्थेकडून करण्याचे आहेत

**अ.३- प्रयोगशाळेमधील तपासणी**

अ.३.१ शिबीरामध्ये अथवा बांधकाम कामगारांच्या घरोघरी जाऊन लाभार्थ्यांच्या प्राथमिक आरोग्य तपासण्यांच्या नमुन्यांच्या (Samples) अनुषंगाने सोबत जोडलेल्या विवरणपत्रामध्ये (Annexure-A) नमूद आरोग्य चाचण्या शासनाच्या मान्यतेने निश्चीत करण्यात आल्या आहेत.

अ.३.२ चाचण्यांचे दर Central Government Health Scheme (CGHS) च्या दरापेक्षा अधिक राहणार नाहीत, यांची दक्षता पुरवठादार संस्थेने घ्यावी.

**अ.४- तपासणी नंतर सल्लामसलत (Consultation) शिबीराचे आयोजन (Post-Health Camp)**

अ ४.१ लाभार्थ्यांच्या आरोग्य तपासणीचे अहवाल प्राप्त झाल्यानंतर नियुक्त संस्थेमार्फत तपासणीनंतर सल्लासलत (Consultation) शिबीराचे (Post-Health Camp) आयोजन करण्यात यावे.

अ४.२ सदर शिबीरामध्ये तपासणी अहवालाचे वितरण लाभार्थ्यांना करण्यात यावे.

अ४.३ तपासणी अहवालाच्या अनुषंगाने लाभार्थ्यांचे डॉक्टरांसोबत सल्लामसलत (Consultation) करण्यात येईल.

अ.४.४ तपासणी अहवाल, लाभार्थ्यांना नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर पाठविण्यात यावा. तसेच संगणक प्रणालीमध्ये उपलब्ध करून द्यावयाची आहे.

अ.४.५ प्राथमिक आरोग्य तपासणी चाचणीमध्ये सामान्य अहवाल (Normal Report) असलेल्या लाभार्थ्यांची पुढील कार्यवाही (Case) बंद करण्यात यावी.

अ.४.६ प्राथमिक आरोग्य तपासणी चाचणीमध्ये असामान्य अहवाल (Abnormal Report) असलेल्या लाभार्थ्यांस आवश्यकतेनुसार लाभार्थ्यांच्या सहमतीने औषधोपचाराची शिफारस करण्यात यावी अथवा प्रगत पुष्ठीकरण आरोग्य तपासणी चाचणी (Advanced Confirmatory Test) करीता सूचविण्यात यावे.

**(ब) प्रगत पुष्ठीकरण आरोग्य तपासणी चाचणी**

**(Advanced Confirmatory Test)**

ब.१. प्राथमिक आरोग्य तपासणी चाचणीमधील ज्या चाचणीचा अहवाल असामान्य (Abnormal Report) असेल अशा चाचणीची दुबार चाचणी करण्याची मागणी लाभार्थ्यांने केल्यास, नियुक्त संस्थेने विनाशुल्क एकवेळेस अशी चाचणी करावयाची आहे.

ब.२. प्राथमिक आरोग्य तपासणी चाचणीमध्ये असामान्य अहवाल (Abnormal Report) असलेल्या लाभार्थ्यांची सहमती असल्यास त्याची प्रगत पुष्ठीकरण आरोग्य तपासणी चाचणी (Advanced Confirmatory Test) संस्थेने करावी.

ब.३. नियुक्त संस्थेने मंडळाच्या मान्यतेने सूचीबद्ध (Empanelled) केलेल्या रूग्णालयामध्ये/तपासणी प्रयोगशाळांमध्ये/सूचीबद्ध (Empanelled) प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये प्रगत पुष्ठीकरण आरोग्य तपासणी चाचणी (Advanced Confirmatory Test) करण्यात यावी.

ब.४. प्रगत पुष्ठीकरण आरोग्य तपासणी चाचण्या (Advanced Confirmatory Test) ह्या केवळ जिवीतास धोका निर्माण करणाऱ्या आजाराच्या (Life Threatening Diseases) बाबतीत दि.२१.०२.२०२४ रोजीच्या कार्यारंभ आदेशामध्ये जोडलेल्या विवरणपत्रांमध्ये (Annexure-B, C, D, E, F, G & H) नमूद केलेल्या प्रगत पुष्ठीकरण चाचण्या शासन मान्यतेने निश्चित करण्यात आल्या आहेत.

ब.५. चाचण्यांचे दर हे CGHS (Central Government Health Scheme) च्या दराच्या मर्यादेत राहतील.

ब.६. प्रगत पुष्ठीकरण आरोग्य तपासणी चाचणीमध्ये (Advanced Confirmatory Test) सामान्य अहवाल (Normal Report) असलेल्या लाभार्थ्यांची पुढील कार्यवाही (Case) बंद करण्यात यावी तशी नोंद संगणक प्रणालीत उपलब्ध करावी.

ब.७. प्रगत पुष्ठीकरण आरोग्य तपासणी चाचणीमध्ये (Advanced Confirmatory Test) असामान्य अहवाल (Abnormal Report) असलेल्या लाभार्थ्यांस, आवश्यकतेनुसार लाभार्थ्याच्या सहमतीने औषधोपचाराची शिफारस करण्यात यावी अथवा उपचाराकरीता सूचिबद्ध रुग्णालयामध्ये भरती करण्यात यावे.

(क) **वैद्यकीय उपचार**

**(क-१) औषधोपचार**

क-१.१ प्राथमिक आरोग्य तपासणी चाचणीमध्ये तसेच, प्रगत पुष्ठीकरण आरोग्य तपासणी चाचणीमध्ये (Advanced Confirmatory Test) असामान्य अहवाल (Abnormal Report) असलेल्या लाभार्थ्यांस आवश्यकतेनुसार लाभार्थ्याच्या सहमतीने औषधोपचार करण्यात यावेत.

क-१.२ सदर योजनेअंतर्गत नियुक्त संस्था केंद्र शासनाच्या जन औषधी/अम्रित (AMRIT) योजनेअंतर्गत निश्चित केलेल्या दराच्या मर्यादेत सोबत जोडलेल्या विवरणपत्राप्रमाणे (Annexure-I) नियुक्त संस्था औषधांचा पुरवठा लाभार्थ्यांना करेल.

क-१.३ सदर योजनेअंतर्गत प्रति लाभार्थी (जिवित सक्रिय नोंदणी कालावधी) प्रति वर्ष रक्कम रू. ५,०००/- च्या मर्यादेत नियुक्त संस्था औषधांचा पुरवठा करेल.

**(क-२) रूग्णालय भरती**

क-२.१ प्रगत पुष्ठीकरण आरोग्य तपासणी चाचणीमध्ये (Advanced Confirmatory

Test) असामान्य अहवाल (Abnormal Report) असलेल्या लाभार्थ्यांस, त्याच्या सहमतीने उपचाराकरीता संस्थेने सूचीबद्ध (Empanelled) केलेल्या रूग्णालयामध्ये भरती करण्यात येईल.

क-२.२ लाभार्थीवर उपचार करण्यात येणारी रूग्णालये ही नियुक्त संस्थेने मंडळाच्या मान्यतेने सूचीबद्ध करणे आवश्यक राहील.

क-२.३ रूग्णालयामध्ये लाभार्थ्यास भरती केल्यानंतर त्याची नोंदणी करण्यात (Admission) याची तसेच, उपचाराअंती Discharge Paper व झालेला एकूण खर्च याच्या नोंदी नियुक्त संस्थेमार्फत संगणक प्रणालीवर ठेवायच्या आहे.

क-२.४ उपचारावर झालेल्या खर्चाच्या रक्कम रु.२.०० लक्ष च्या मर्यादेमध्ये रुग्णालयास नियुक्त संस्थेकडून अदायगी करण्यात येईल व सदर रकमेची प्रतिपुर्ती मंडळाकडून नियुक्त संस्थेस करण्यात येईल. सदर खर्च मर्यादत करण्यात येणाऱ्या बाहयरूग्ण उपचार पध्दती (OPD Procedure), Diagnostic Labs & Imaging Centres, Treatment Procedure/ Investigation List यांची यादी दि.२१.०२.२०२४ रोजीच्या कार्यारंभ आदेशामध्ये जोडलेल्या विवरणपत्राप्रमाणे (Annexure-J) राहील.

क-२.५ विशिष्ठ आजाराच्या प्रकरणी उपचाराचा खर्च रक्कम रु.२.०० लक्ष पेक्षा जास्त मात्र रू.७.०० लक्ष च्या मर्यादेत होणार असल्यास, संबंधित रूग्णालयाच्या वैद्यकीय प्रमुख यांची शिफारस तसेच, जिल्हा कामगार सुविधा केंद्राचे प्रमुख कामगार उप आयुक्त/ सहाय्यक कामगार आयुक्त/सरकारी कामगार अधिकारी यांच्या मान्यतेने व संबंधित जिल्ह्याच्या शासकीय रूग्णालयाचे अधिष्ठाता यांच्या शिफारशीने अशी प्रकरणे शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा कामगार विभाग दि.०७.०८.२०२३ अन्वये गठित **"बांधकाम कामगार आरोग्य समिती"** कडे सादर करण्यात यावीत.

क-२.६ सदर "तपासणी ते उपचार आरोग्य योजना" या योजनेअंतर्गत मंडळातर्गत नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगार तसेच, त्यांच्या कुटुंबामधील पती अथवा पत्नी व प्रथम दोन अपत्ये यापैकी प्रत्येक घटकास प्रतिवर्षात एकदा कमाल रू.७.०० लक्ष मर्यादेतच उपचारास पात्र राहील.

**(३) अपघातप्रकरणी वैद्यकीय सहाय्य**

३.१ बांधकामाच्या ठिकाणी नोंदित सक्रिय (जिवित) बांधकाम कामगारास अपघात झाल्यास ती व्यक्ती सदर योजनेअंतर्गत उपचारास पात्र राहील.

३.२ बांधकाम कामगारास अपघात झाल्यास आवश्यकतेनुसार व सोईनुसार ज्या रुग्णालयामध्ये उपचाराकरीता भरती केले असेल, असे रुग्णालय खाजगी असल्यास तात्पुरत्या स्वरुपात सूचीबद्ध (Empanelled) करुन पुढील उपचार नियुक्त संस्थेने करावेत.

३.३ अपघातानंतर उपचाराकरीता असलेल्या रुग्णलयाची माहिती लाभार्थी/कामाची आस्थापना/नातेवाईक/इतर व्यक्तींनी नियुक्त संस्थेस टोल फ्री क्रमांकावर अथवा जिल्हा/तालुका कामगार सुविधा केंद्रास देणे आवश्यक राहील.

३.४ अपघातावरील उपचारास खर्च परिच्छेद ४ (क-२.४) व ४ (क-२.५) अन्वये अनुज्ञेय राहील.

(४) नोंदित सक्रिय (जिवित) बांधकाम कामगारांच्या पहिल्या दोन **१० वर्षाखालील** अपत्यांना विशेष बाब म्हणून सदर योजनेचा अपघात व आजारपणाकरीता रूग्णालय भरती व औषधोपचार या दोन बाबीकरीता पात्र राहतील. प्राथमिक आरोग्य तपासणी चाचणी अनुज्ञेय राहणार नाही.

(५) **सूचीबद्ध (Empanelled) रुग्णालये**

**५.१ स्थिर आरोग्य तपासणी केंद्रे-**

नियुक्त संस्थेने, प्रत्येक तालुक्यात किमान एक याप्रमाणे निश्चित ठिकाणी कायमस्वरुपी आरोग्य तपासणी केंद्रे मंडळाच्या मान्यतेने सूचीबद्ध (Empanelled) करावीत. अशा ठिकाणी लाभार्थी भेट देवून प्राथमिक आरोग्य तपासणी करू शकेल व तपासणी अहवाल (प्राथमिक व प्रगत पुष्ठीकरण) मिळवू शकेल.

५.२ प्रगत पुष्ठीकरण आरोग्य तपासणी चाचणी (Advanced Confirmatory Test) तसेच, वैद्यकीय उपचाराकरीता नियुक्त संस्था रूग्णालये सूचीबद्ध (Empanelled) करतील.

५.३ प्रत्येक जिल्हा कामगार सुविधा केंद्राच्या क्षेत्रामध्ये किमान तीन रूग्णालये मंडळाच्या मान्यतेने सूचीबद्ध (Empanelled) करण्यात यावीत. तथापि, आवश्यकतेनुसार यामध्ये वाढ करण्यात यावी.

५.४ सर्व प्रकाराच्या आरोग्य तपासणी चाचण्यांकरीता तपासणी प्रयोगशाळा (Labs) नियुक्त संस्थेने मंडळाच्या मान्यतेने सूचीबद्ध करणे आवश्यक राहील.

(६) **फिरते वैद्यकीय कक्ष (Mobile Medical Unit-MMU)**

६.१ नियुक्त संस्थेमार्फत प्रत्येक जिल्हा कामगार सुविधा केंद्राच्या क्षेत्रामध्ये २४x७ कार्यरत राहील, असे किमान एक फिरते वैद्यकीय कक्ष (Mobile Medical Unit) वाहन स्वरूपामध्ये उपलब्ध करून देणे आवश्यक राहील. तथापि, आवश्यकतेनुसार यामध्ये वाढ करण्यात यावी. या कक्षावरील होणारा खर्च नियुक्त संस्थेमार्फत भागविण्यात येईल. या योजनेबाबत नियुक्त संस्थेसोबतचा करार संपुष्टात आल्यानंतर ती वाहने मंडळाकडे हस्तांतर करणे आवश्यक राहील.

६.२ नियुक्त संस्थेमार्फत फिरते वैद्यकीय कक्ष (Mobile Medical Unit) वाहन हे विनाशुल्क उपलब्ध करून देणे आवश्यक राहील.

६.३ सदरच्या फिरते वैद्यकीय कक्ष (Mobile Medical Unit) वाहनामध्ये डॉक्टर, परिचारक व मदतनीस उपलब्ध राहतील.

६.४ सदरचे फिरते वैद्यकीय कक्ष (Mobile Medical Unit) वाहन हे अत्याधुनिक जीवन समर्थन प्रणालीयुक्त (Advanced Life Support System) असावे.

६.५ सदरच्या फिरते वैद्यकीय कक्ष (Mobile Medical Unit) वाहनामध्ये लाभार्थ्यांना द्यावयाची औषधे, आपत्कालीन परिस्थितीमध्ये लागणारी अत्यावश्यक औषधे, प्रथोमोपचार इ. सुविधा असणे आवश्यक आहे.

६.६ सदरचे फिरते वैद्यकीय (Mobile Medical Unit) वाहन हे या योजनेकरीता तयार केलेल्या समर्पित बांधकाम कामगार आरोग्य क्रमांकाशी संलग्न राहील.

**(७) समर्पित बांधकाम कामगार आरोग्य प्रणाली (Dedicated Software Management System)**

७.१ नियुक्त संस्था लाभार्थ्यांच्या प्राथमिक आरोग्य तपासणीपासून उपचारापर्यंत देण्यात येणाऱ्या सुविधांचे देखरेख व संनियंत्रण करण्याकरीता समर्पित बांधकाम कामगार आरोग्य प्रणाली (Dedicated Software Management System) मंडळाच्या नियंत्रणाखाली विनाशुल्क निर्माण करेल. या प्रणालीवरील होणारा खर्च नियुक्त संस्थेमार्फत भागविण्यात येईल. या योजनेबाबत नियुक्त संस्थेसोबतचा करार संपुष्टात आल्यानंतर सदर प्रणाली मंडळाकडे हस्तांतर करणे आवश्यक राहील.

७.२ सदर प्रणालीमध्ये सर्व प्रकारच्या नोंदी कायमस्वरुपी नोंदविण्यात येतील.

७.३ सदर प्रणालीद्वारे लाभार्थी स्वत:च्या नोंदीची माहिती उपलब्ध करून घेवू शकेल.

७.४ सदर प्रणालीद्वारे या योजनेतील सर्व प्रकारच्या देयकाचे संनियंत्रण करण्यात येईल.

**(८) समर्पित बांधकाम कामगार आरोग्य टोल फ्री क्रमांक (Dedicated Toll Free Number)**

८.१ नियुक्त संस्था संपूर्ण राज्याकरीता एकच समर्पित बांधकाम कामगार आरोग्य टोल-फ्री क्रमांक (Dedicated Toll Free Number) म्हणून मंडळाच्या नियंत्रणाखाली विनाशुल्क निर्माण करेल. या टोल-फ्री क्रमांकावरील होणारा खर्च नियुक्त संस्थेमार्फत भागविण्यात येईल. **या योजनेबाबत नियुक्त संस्थेसोबतचा करार संपुष्टात आल्यानंतर सदर टोल-फ्री क्रमांक मंडळाकडे हस्तांतर करणे आवश्यक राहील.**

८.२ नियुक्त संस्था कॉल सेंटर निर्माण करून संपूर्ण राज्यामधून येणाऱ्या कॉलचे संनियंत्रण करेल. तसेच त्यासाठी होणारा खर्च नियुक्त संस्थेमार्फत भागविण्यात येईल.

**(९) व्यावसायीक आरोग्य केंद्राची उभारणी (Occupational Health Centre)**

कामाच्या ठीकाणी आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन करणे, घरोघरी जावून आरोग्य तपासण्या करणे इ. करीता अनुभवी वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्या व्यक्तीच्या निगराणीखाली व्यावसायिक आरोग्य केंद्रे खालीलप्रमाणे उभारली जाणार आहेत.

➢ **जिल्हा व्यावसायिक आरोग्य केंद्र.**

जिल्हयामधील लाभार्थ्याची वार्षिक प्राथमिक आरोग्य तपासणी करण्याकरीता प्रत्येक जिल्हा बांधकाम कामगार रूग्णालय मध्ये जिल्हा व्यावसायीक आरोग्य केंद्राची उभारणी करण्यात यावी.

➢ **विभागीय व्यावसायिक आरोग्य केंद्र.**

विभागीय स्तरावर प्रत्येक विभागीय बांधकाम कामगार रूग्णालय मध्ये विभागीय व्यावसायीक आरोग्य केंद्राची उभारणी करण्यात यावी.

➢ **राज्यस्तरीय व्यावसायिक आरोग्य केंद्र**

राज्यस्तरीय बांधकाम कामगार रूग्णालय मध्ये राज्यस्तरीय व्यावसायीक आरोग्य केंद्राची उभारणी करण्यात यावी.

**(१०) बांधकाम कामगार रूग्णालय**

**सर्व वैद्यकीय सोई-सुविधांनी युक्त NATIONAL ACCREDITION BOARD FOR HOSPITALS & HEALTHCARE PROVIDERS (NABH) ने निश्चीत केलेल्या गुणवत्ता निकषानुसार बांधकाम कामगार रूग्णालयाची उभारणी खालीलप्रमाणे करण्यात येणार आहे.**

➢ **जिल्हा बांधकाम कामगार रूग्णालय**

दुय्यम काळजी दर्जाची (Secondary Care) ५० पेक्षा अधिक खाटेच्या क्षमतेचे प्रत्येक जिल्हयामध्ये एक रूग्णालय उभारण्यात यावे.

➢ **विभागीय बांधकाम कामगार रूग्णालय**

**अत्याधुनिक दर्जाची (Multi-Specialty) ७५-१०० खाटेच्या क्षमतेचे** प्रत्येक जिल्हयामध्ये एक रूग्णालय उभारण्यात यावे.

➢ **राज्यस्तरीय बांधकाम कामगार रूग्णालय**

**अत्याधुनिक दर्जाची (Multi-Specialty) १०० पेक्षा जास्त खाटेच्या क्षमतेचे** प्रत्येक जिल्हयामध्ये एक रूग्णालय उभारण्यात यावे.

**(१२) माहिती व्यवस्थापन प्रणाली-**

सदर प्रकल्पाअंतर्गत निमार्ण होणारे सर्व अहवाल जतन करण्याकरीता माहिती व्यवस्थापन प्रणाली निर्माण करण्यात यावी.

**(१२) लाभाची व खर्चाची प्रतिपुर्ती**

सदर योजनेअंतर्गत केद्र शासन आरोग्य योजना (CGHS) दरानुसार उपचाराचे दर राहतील व औषधांचा पुरवठा जन-औषधी दरानुसार होईल. संदर्भाधिन (०१ व (०२) अन्वये मान्यता देण्यात आलेली तपासणी ते उपचार आरोग्य योजना योजनेअंतर्गत परि. (०१) अन्वये निश्चीत केलेले लाभार्थी पात्र राहतील. तथापि, परि. (०९) अन्वये सुरू करण्यात येत असलेल्या BOMT (Build Operate Manage Transfer) या योजनेअंतर्गत परि (०१) अन्वये निश्चीत केलेले लाभार्थी तसेच, असंघटीत कामगारसुध्दा लाभार्थी राहतील.

परि. (०१) अन्वये निश्चीत केलेल्या लाभार्थी करीता खर्चाची प्रतिपुर्ती महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांच्याकडून करण्यात येईल. तथापि, असंघटीत कामगारांकरीता होणाऱ्या खर्चाची प्रतिपुर्ती महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांच्याकडून होणार नाही. सदर योजनेअंतर्गत केंद्र शासन आरोग्य योजना (CGHS) दरानुसार उपचाराचे दर राहतील व औषधांचा पुरवठा जन- औषधी दरानुसार होईल.

**(१३) योजना अंमलबजावणीचा कालावधी**

एचएससीसी (इंडिया) लिमिटेड (भारत सरकार उद्योग) यांनी मे. एचएचएल लाईफकेअर लिमिटेड (भारत सरकार उद्योग) यांचेसह संयुक्तपणे दि.०८.०१.२०२९ पर्यंत सदर योजना राबवावयाची असून तदनंतर सदर संस्थेचा BOMT (Build Operate Manage Transfer) तत्वावर रूग्णालय उभारणीव्दारे तपासणी ते उपचार आरोग्य योजना राबविण्याचा कालावधी दि.०८.०१.२०५९ अखेर राहील.

सदर योजनेअंतर्गत एच.एस.सी.सी. (इंडिया) लिमिटेड (भारत सरकार उद्योग) यांनी प्रथमच्या अंदाजे ५ वर्षाच्या कालावधीमध्ये (दिनांक ०८.०१.२०२९ अखेर) रूग्णालय व तद्अनुषंगिक बाबींची उभारणी करण्यात यावी. तद्नंतर प्रकल्प अंमलबजावणी कालावधी ३० वर्षाचा (दिनांक ०९.०१.२०२९ ते दिनांक ०८.०१.२०५९) राहील. याकरीता होणारा सर्व खर्च एच.एस.सी.सी. (इंडिया) लिमिटेड (भारत सरकार उद्योग) यांच्याकडून करण्यात येईल व प्रकल्प कालावधी संपुष्टात आल्यानंतर संपुर्ण मालमत्ता (सर्व स्तरावरील रूग्णालयाची स्थावर जंगम वैद्यकीय सोई-सुविधांसह) आहे त्या स्वरूपात मंडळाकडे विनामुल्य वर्ग करण्यात येईल. यामध्ये मुष्यबळ वर्ग होणार नाही. स्थावर, जंगम व वैद्यकीय सोई-सुविधा करीता कोणत्याही खर्चाची प्रतिपूर्ती मंडळाकडून एच.एस.सी.सी. (इंडिया) लिमिटेड (भारत सरकार उद्योग) यांच्याकडून होणार नाही.

**(१४) योजना अंमलबजावणी**

सदर योजनेच्या समन्वयाकरीता एच.एस.सी.सी. (इंडिया) लिमिटेड (भारत सरकार उद्योग) यांची "समन्वयक" म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे. आपली संस्था समन्वयक असल्याने उभय संस्थाकरीता समर्पित बांधकाम आरोग्य प्रणाली (Dedicated Software Management System) व समर्पित बांधकाम कामगार आरोग्य टोल फ्री क्रमांक (Dedicated Toll Free Number) यांचे संपूर्ण व्यवस्थापनाची जबाबदारी दि.०१.०८.२०२४ पासून आपल्या संस्थेची राहील.

सदर तपासणी ते उपचार आरोग्य योजना एच.एस.सी.सी. (इंडिया) लिमिटेड (भारत सरकार उद्योग) व मे. एचएचएल लाईफकेअर लिमिटेड (भारत सरकार उद्योग) यांचेमार्फत संयुक्तपणे राबविण्यात येत असल्याने सोबतच्या प्रपत्रात नमुद केल्यानुसार दोन्ही संस्थामध्ये योजनेच्या अंमलबजावणीकरीता जिल्हयांची विभागणी करण्यात येत आहे. ज्या जिल्हयात मे. एच एस सी सी (इंडिया) लिमिटेड (भारत सरकार उद्योग) यांच्याकडून योजनेची अंमलबजावणी होणार आहे, अशा जिल्हयातील फिरते वैद्यकीय कक्ष (Mobile Medical Unit), मे.एच एस सी सी (इंडिया) लिमिटेड (भारत सरकार उद्योग) यांनी मे.

एचएचएल लाईफकेअर लिमिटेड (भारत सरकार उद्योग) यांचेकडून हस्तांतरीत करून घ्यावेत. तसेच संबंधित जिल्हयातील सुचिबध्द केलेले रूग्णालय देखील आपण आपल्या संस्थेकडे सुचिबध्द करून घ्यावीत.

संदर्भ (७) मध्ये नमुद केल्यानुसार आपल्या संस्थेमार्फत BOMT (Build Operate Manage Transfer) तत्वावर रूग्णालय उभारणीव्दारे तपासणी ते उपचार आरोग्य योजना राबविण्यात येणार असल्याने जस जसे मे. एचएचएल लाईफकेअर लिमिटेड (भारत सरकार उद्योग) यांचेकडील जिल्हयात आपल्यामार्फत रूग्णालय उभारणी होईल तस तसे सदर जिल्हयातील योजनेची अंमलबजावणी तातडीने आपल्यामार्फत करण्यात यावी. त्याकरीता स्वतंत्र आदेश निर्गमीत करण्यात येणार नाहीत.

**(१५)** शासन निर्णय, उद्योग, उर्जा व कामगार विभाग दि.०७.०८.२०२३, ०९.०१.२०२४ व दि.१२.०७.२०२४ मधील अटी व शर्ती सदर कार्यादेशास लागू राहतील.

**(१६)** मंडळ व मे.एच एस सी सी (इंडिया) लिमिटेड (भारत सरकार उद्योग) यांच्यामध्ये सदर प्रकरणी दि.१८.०७.२०२४ अन्वये करण्यात आलेल्या करारनाम्यातील सर्व अटी व शर्ती सदर कार्यादेशास लागू राहतील.

१८/०७/२०२४

(विवेक कुंभार)
**सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम**
**कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई.**

**प्रत :-**

१. मा. मंत्री (कामगार) तथा मा. अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. मा. प्रधान सचिव, (कामगार), उद्योग, उर्जा व कामगार विभाग मंत्रालय मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
३. मा. कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर
४. अप्पर कामगार आयुक्त, मुंबई कोकण विभाग/ पुणे/ नागपूर
५. कामगार उप आयुक्त, मुंबई शहर/मुंबई उपनगर (पुर्व)/ मुंबई उपनगर (पश्चिम) नाशिक/ औरंगाबाद/ पालघर/ रायगड
६. सहाय्यक कामगार आयुक्त/ सरकारी कामगार अधिकारी (सर्व जिल्हा कार्यालये) यांना उचित कार्यवाहीस्तव

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई अंतर्गत नोंदित सक्रिय (जिवित) बांधकाम कामगार यांचेकरीता "तपासणी ते उपचार आरोग्य योजना" राबविणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: इबांका-२०२३/प्र.क्र.७७/कामगार-७**
मंत्रालय मुंबई - ४०० ०३२
दिनांक: ०७ ऑगस्ट, २०२३

**संदर्भ** : (१) शासन समक्रमांक दिनांक ३१.०५.२०२३ रोजीचे पत्र
(२) सार्व.आरोग्य विभाग, शा. नि. क्रमांक: मफुयो-२०२३/प्र.क्र.१६०/आरोग्य-६, दि.२८.०७.२०२३

**<u>प्रस्तावना :-</u>**

इमारत व इतर बांधकाम व्यवसायामधील कामगारांच्या हिताचे रक्षण करण्याच्या दृष्टीने, केंद्र शासनाने इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ लागू केला आहे. सदर अधिनियमामधील तरतुदींची अंमलबजावणी करण्याकरीता महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) नियम, २००७ अस्तित्वात आले असून अधिनियमातील कलम १८ अन्वये महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची स्थापना करण्यात आलेली आहे. अधिनियमामधील तरतूदीनुसार बांधकाम कामगारांची नोंदणी व नुतनीकरण करण्यात येते. बांधकाम कामगारांचे काम हे अंगमेहनतीचे व कष्टपूर्ण असल्याने त्यांना आरोग्याच्या समस्या प्रकर्षाने उद्भवण्याची दाट शक्यता असते. वेळोवेळी त्यांच्या आरोग्याच्या तपासण्या झाल्यास भविष्यात उद्भवणाऱ्या आरोग्याच्या समस्यांवर प्राथमिक स्तरावर उपचार करणे शक्य होईल. यादृष्टीने, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई अंतर्गत नोंदित सक्रिय (जिवित) बांधकाम कामगार यांचेकरीता "तपासणी ते उपचार आरोग्य योजना" राबविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई अंतर्गत नोंदित सक्रिय (जिवित) बांधकाम कामगार यांचेकरीता "तपासणी ते उपचार आरोग्य योजना" राबविण्यास सदर शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

**२. योजनेचे लाभार्थी :-**

(अ) सदर योजनेअंतर्गत सर्व नोंदित सक्रिय (जिवित) बांधकाम कामगार तसेच, त्यांच्या कुटुंबामधील पती अथवा पत्नी व १० वर्षावरील प्रथम दोन अपत्ये ही लाभार्थी म्हणून गणण्यात येतील.

(ब) सदर योजनेअंतर्गत बांधकाम कामगारांच्या सक्रिय (जिवित) नोंदणी कालावधीमध्ये वर्षातून एकदा सदर योजनेच्या लाभासाठी लाभार्थी पात्र राहील.

(क) सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दिनांक २८.०७.२०२३ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार नोंदीत सक्रिय (जिवित) बांधकाम कामगार अथवा त्याच्या कुटुंबातील पात्र व्यक्तींनी आरोग्य योजनेचा लाभ घेतला असल्यास त्यांना शासकीय योजनेची द्विरुक्ती टाळण्यासाठी या योजनेचा लाभ मिळणार नाही. मात्र, त्या बांधकाम कामगाराचा अथवा कुटुंबातील पात्र लाभार्थ्याच्या उपचारावरील खर्च रुपये ५.०० लक्षपेक्षा अधिक होणार असल्यास या योजनेच्या खर्चाच्या मर्यादेत नियुक्त संस्थेने महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या सहमतीने सूचीबद्ध केलेल्या रुग्णालयांमार्फत उपचाराकरीता सदर लाभार्थी पात्र राहील.

(ड) सदरची योजना मंडळाकडे नोंदित सक्रिय (जिवित) बांधकाम कामगारांकरीता ऐच्छिक स्वरूपाची राहील.

## ३. अंमलबजावणी यंत्रणा व आर्थिक तरतूद :-

(अ) सदरची योजना महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांचेकडून जिल्हा कामगार सुविधा केंद्र या घटकामार्फत राबविण्यात येईल.

(ब) मंडळाकडे जमा होणाऱ्या उपकरामधून सदर योजनेवरील खर्च भागविण्यात येईल.

(क) सदर योजनेच्या संनियंत्रणाकरीता मंडळाच्या स्तरावर प्रकल्प अंमलबजावणी समिती (PMC) गठीत करण्यात यावी.

(ड) योजनेवर होणाऱ्या खर्चाच्या २% खर्च प्रशासकीय खर्च म्हणून मंडळास अनुज्ञेय राहील.

## ४. योजनेचे टप्पे :-

सदरची योजना खालील तीन टप्प्यामध्ये राबविण्यात येईल.

**(अ) प्राथमिक आरोग्य तपासणी चाचणी**

अ.१ - तपासणी पूर्व आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन (Pre-Health Camp) -

नियुक्त संस्था, जिल्हा कामगार सुविधा केंद्राचे प्रमुख कामगार उपायुक्त/सहायक कामगार आयुक्त/सरकारी कामगार अधिकारी यांच्या मान्यतेने शिबीराची ठिकाणे, दिनांक व वेळ निश्चित करतील.

अ.२- आरोग्य तपासणी शिबीरामधील उपक्रम -

अ.२.१ नियुक्त संस्था, शिबीराकरीता निश्चित केलेल्या लाभार्थ्यांना एकत्रित करतील व त्यांची नोंदणी करण्यात येईल.

अ.२.२ नियुक्त संस्था, शिबीरामध्ये आवश्यकतेनुसार डॉक्टर व वैद्यकीय सहाय्यक उपलब्ध करून देतील.

अ.२.३ शिबीरामध्ये लाभार्थ्यांची शारीरीक तपासणी करण्यात येईल व त्यांच्या पूर्व आजार तथा वैद्यकीय इतिहासाबाबत माहिती नोंदविण्यात येईल.

अ.२.४ शिबीरामध्ये नियुक्त संस्थेमार्फत लाभार्थ्यांच्या तपासणीसाठीचे नमुने (Samples) गोळा करण्यात येतील.

अ.२.५ बांधकाम कामगारांच्या करावयाच्या प्राथमिक आरोग्य तपासणी चाचण्या ह्या वरील नमूद शिबीरामध्ये अथवा बांधकाम कामगारांच्या घरोघरी जाऊन नियुक्त संस्थेकडून करण्यात येतील.

अ.३- प्रयोगशाळेमधील तपासणी -

अ.३.१ शिबीरामध्ये अथवा बांधकाम कामगारांच्या घरोघरी जाऊन लाभार्थ्यांच्या प्राथमिक आरोग्य तपासण्यांच्या नमुन्यांच्या (Samples) अनुषंगाने करावयाच्या चाचण्या शासनाच्या मान्यतेने निश्चित करण्यात येतील.

अ.३.२ चाचण्यांचे दर हे CGHS (Central Government Health Scheme) च्या दराच्या मर्यादेत राहतील.

अ.४ - तपासणी नंतर सल्लामसलत (Consultation) शिबीराचे आयोजन (Post-Health Camp) -

अ.४.१ लाभार्थ्यांच्या आरोग्य तपासणीचे अहवाल प्राप्त झाल्यानंतर नियुक्त संस्थेमार्फत तपासणीनंतर सल्लामसलत (Consultation) शिबीराचे (Post-Health Camp) आयोजन करण्यात येईल.

अ.४.२ सदर शिबीरामध्ये तपासणी अहवालाचे वितरण लाभार्थ्यांना करण्यात येईल.

अ.४.३ तपासणी अहवालाच्या अनुषंगाने लाभार्थ्यांचे डॉक्टरांसोबत सल्लामसलत (Consultation) करण्यात येईल.

अ.४.४ तपासणी अहवाल, लाभार्थ्यांना नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर पाठविण्यात येईल. तसेच, संगणक प्रणालीमध्ये उपलब्ध करून देण्यात येईल.

अ.४.५ प्राथमिक आरोग्य तपासणी चाचणीमध्ये सामान्य अहवाल (Normal Report) असलेल्या लाभार्थ्यांची पुढील कार्यवाही (Case) बंद करण्यात येईल.

अ.४.६ प्राथमिक आरोग्य तपासणी चाचणीमध्ये असामान्य अहवाल (Abnormal Report) असलेल्या लाभार्थ्यांस आवश्यकतेनुसार लाभार्थ्याच्या सहमतीने औषधोपचाराची शिफारस करण्यात येईल अथवा प्रगत पुष्ठीकरण आरोग्य तपासणी चाचणी (Advanced Confirmatory Test) करीता सूचविण्यात येईल.

**(ब) प्रगत पुष्ठीकरण आरोग्य तपासणी चाचणी (Advanced Confirmatory Test)**

ब.१. प्राथमिक आरोग्य तपासणी चाचणीमधील ज्या चाचणीचा अहवाल असामान्य (Abnormal Report) असेल अशा चाचणीची दुबार चाचणी करण्याची मागणी लाभार्थ्यांने केल्यास, नियुक्त संस्था विनाशुल्क एकवेळेस अशी चाचणी करेल.

ब.२ प्राथमिक आरोग्य तपासणी चाचणीमध्ये असामान्य अहवाल (Abnormal Report) असलेल्या लाभार्थ्यांची सहमती असल्यास त्यास प्रगत पुष्ठीकरण आरोग्य तपासणी चाचणी (Advanced Confirmatory Test) करीता शिफारस करण्यात येईल.

ब.३ नियुक्त संस्थेने सूचीबद्ध (Empanelled) केलेल्या रूग्णालयामध्ये/तपासणी प्रयोगशाळांमध्ये/सूचीबद्ध (Empanelled) प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये प्रगत पुष्ठीकरण आरोग्य तपासणी चाचणी (Advanced Confirmatory Test) करण्यात येईल.

ब.४ प्रगत पुष्ठीकरण आरोग्य तपासणी चाचण्या (Advanced Confirmatory Test) ह्या केवळ जिवीतास धोका निर्माण करणाऱ्या आजाराच्या (Life Threatening Diseases) बाबतीत करावयाच्या चाचण्या शासन मान्यतेने निश्चित करण्यात येतील.

ब.५ चाचण्यांचे दर हे CGHS (Central Government Health Scheme) च्या दराच्या मर्यादेत राहतील.

ब.६ प्रगत पुष्ठीकरण आरोग्य तपासणी चाचणीमध्ये (Advanced Confirmatory Test) सामान्य अहवाल (Normal Report) असलेल्या लाभार्थ्यांची पुढील कार्यवाही (Case) बंद करण्यात येईल.

ब.७ प्रगत पुष्ठीकरण आरोग्य तपासणी चाचणीमध्ये (Advanced Confirmatory Test) असामान्य अहवाल (Abnormal Report) असलेल्या लाभार्थ्यांस, आवश्यकतेनुसार लाभार्थ्याच्या सहमतीने औषधोपचाराची शिफारस करण्यात येईल अथवा उपचाराकरीता सूचिबद्ध रूग्णालयामध्ये भरती करण्यात येईल.

**(क) वैद्यकीय उपचार**

(क-१) **औषधोपचार**

क-१.१ प्राथमिक आरोग्य तपासणी चाचणीमध्ये तसेच, प्रगत पुष्ठीकरण आरोग्य तपासणी चाचणीमध्ये (Advanced Confirmatory Test) असामान्य अहवाल (Abnormal Report) असलेल्या लाभार्थ्यांस आवश्यकतेनुसार लाभार्थ्याच्या सहमतीने औषधोपचार करण्यात येईल.

क-१.२ सदर योजनेअंतर्गत केंद्र शासनाच्या जन औषधी/अम्रित (AMRIT) योजनेअंतर्गत निश्चित केलेल्या दराच्या मर्यादेत औषधांचा पुरवठा लाभार्थ्यांना करेल.

क-१.३ सदर योजनेअंतर्गत प्रति लाभार्थी (जिवित सक्रिय नोंदणी कालावधी) प्रति वर्ष रक्कम रू. ५,०००/- च्या मर्यादेत नियुक्त संस्था औषधांचा पुरवठा करेल.

(क-२) **रूग्णालय भरती**

क-२.१ प्रगत पुष्ठीकरण आरोग्य तपासणी चाचणीमध्ये (Advanced Confirmatory Test) असामान्य अहवाल (Abnormal Report) असलेल्या लाभार्थ्यांस, त्याच्या सहमतीने उपचाराकरीता संस्थेने सूचीबद्ध (Empanelled) केलेल्या रूग्णालयामध्ये भरती करण्यात येईल.

क-२.२ लाभार्थीवर उपचार करण्यात येणारी रूग्णालये ही नियुक्त संस्थेकडे सूचीबद्ध असणे आवश्यक राहील.

क-२.३ रूग्णालयामध्ये लाभार्थ्यास भरती केल्यानंतर त्याची नोंदणी करण्यात (Admission) यावी तसेच, उपचाराअंती Discharge Paper व झालेला एकूण खर्च याच्या नोंदी नियुक्त संस्थेमार्फत संगणक प्रणालीवर ठेवण्यात येतील.

क-२.४ उपचारावर झालेल्या खर्चाच्या रक्कम रू.२.०० लक्ष च्या मर्यादेमध्ये रूग्णालयास नियुक्त संस्थेकडून अदायगी करण्यात येईल व सदर रकमेची प्रतिपुर्ती मंडळाकडून नियुक्त संस्थेस करण्यात येईल.

क-२.५ विशिष्ठ आजाराच्या प्रकरणी उपचाराचा खर्च रक्कम रू.२.०० लक्ष पेक्षा जास्त मात्र रु.७.०० लक्ष च्या मर्यादेत होणार असल्यास, संबधित रूग्णालयाच्या वैद्यकीय प्रमुख यांची शिफारस तसेच, जिल्हा कामगार सुविधा केंद्राचे प्रमुख कामगार उप आयुक्त / सहायक कामगार आयुक्त / सरकारी कामगार अधिकारी यांच्या मान्यतेने व संबधित जिल्ह्याच्या शासकीय रूग्णालयाचे अधिष्ठाता यांच्या शिफारशीने अशी प्रकरणे “बांधकाम कामगार आरोग्य समिती” कडे सादर करण्यात यावीत.

**५. बांधकाम कामगार आरोग्य समिती :-**

(अ) मंडळाकडील नोंदित सक्रिय (जिवित) बांधकाम कामगारांच्या उपचाराकरीता रक्कम रू.२.०० लक्षपेक्षा जास्त होणाऱ्या मात्र रक्कम रू. ७.०० लक्षच्या मर्यादेत मान्यता देण्याकरीता खालीलप्रमाणे बांधकाम कामगार आरोग्य समितीचे गठण करण्यात येत आहे:-

१. अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई ---- अध्यक्ष
२. प्रधान सचिव (कामगार), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई ---- सदस्य
३. कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य ---- सदस्य
४. अधिष्ठाता, सर जे.जे. रूग्णालय ,मुंबई अथवा त्यांनी नामनिर्देशित केलेले वरीष्ठ वैद्यकीय अधिकारी ---- सदस्य
५. सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई ---- सदस्य सचिव

(ब) सदर समितीसमोर प्राप्त होणाऱ्या प्रस्तावावर निर्णय घेवून उपचार खर्च अनुज्ञेय करण्यात येईल.

**६. अपघातप्रकरणी वैद्यकीय सहाय्य**

६.१ बांधकामाच्या ठिकाणी नोंदित सक्रिय (जिवित) बांधकाम कामगारास अपघात झाल्यास ती व्यक्ती सदर योजनेअंतर्गत उपचारास पात्र राहील.

६.२. बांधकाम कामगारास आवश्यकतेनुसार व सोईनुसार ज्या रूग्णालयामध्ये उपचाराकरीता भरती केले असेल, असे रूग्णालय खाजगी असल्यास तात्पुरत्या स्वरूपात सूचीबद्ध (Empanelled) करून पुढील उपचार नियुक्त संस्थेने करावेत.

६.३ अपघातानंतर उपचाराकरीता असलेल्या रूग्णालयाची माहिति लाभार्थी/कामाची आस्थापना/नातेवाईक/इतर व्यक्तींनी नियुक्त संस्थेस टोल फ्री क्रमांकावर अथवा जिल्हा/तालुका कामगार सुविधा केंद्रास देणे आवश्यक राहील.

६.४ अपघातावरील उपचाराचा खर्च परिच्छेद ४ (क-२.४) व ४ (क-२.५) अन्वये अनुज्ञेय राहील.

**७. सूचीबद्ध (Empanelled) रूग्णालये**

७.१ स्थिर आरोग्य तपासणी केंद्रे-

नियुक्त संस्थेने, प्रत्येक तालुक्यात किमान एक याप्रमाणे निश्चित ठिकाणी कायमस्वरूपी आरोग्य तपासणी केंद्रे निर्माण करावीत किंवा सूचीबद्ध (Empanelled) करण्यात यावे. अशा ठिकाणी लाभार्थी भेट देवून प्राथमिक आरोग्य तपासणी करू शकेल व तपासणी अहवाल (प्राथमिक व प्रगत पुष्ठीकरण) मिळवू शकेल.

७.२ पुष्ठीकरण आरोग्य तपासणी चाचणी (Advanced Confirmatory Test) तसेच, वैद्यकीय उपचाराकरीता नियुक्त संस्था रूग्णालये सूचीबद्ध (Empanelled) करतील.

७.३ प्रत्येक जिल्हा कामगार सुविधा केंद्राच्या क्षेत्रामध्ये किमान तीन रूग्णालये मंडळाच्या मान्यतेने सूचीबद्ध (Empanelled) करण्यात यावीत. तथापि, आवश्यकतेनुसार यामध्ये वाढ करण्यात यावी.

**८. फिरते वैद्यकीय कक्ष (Mobile Medical Unit - MMU)**

८.१ नियुक्त संस्थेमार्फत प्रत्येक जिल्हा कामगार सुविधा केंद्राच्या क्षेत्रामध्ये २४ x ७ कार्यरत राहील, असे किमान एक फिरते वैद्यकीय कक्ष (Mobile Medical Unit) वाहन स्वरूपामध्ये उपलब्ध करून देणे आवश्यक राहील. तथापि, आवश्यकतेनुसार यामध्ये वाढ करण्यात यावी. या कक्षावरील होणारा खर्च नियुक्त संस्थेमार्फत भागविण्यात येईल. या योजनेबाबत नियुक्त संस्थेसोबतचा करार संपुष्टात आल्यानंतर ती वाहने मंडळाकडे हस्तांतर करणे आवश्यक राहील.

८.२ नियुक्त संस्थेमार्फत फिरते वैद्यकीय कक्ष (Mobile Medical Unit) वाहन हे विनाशुल्क उपलब्ध करून देणे आवश्यक राहील.

८.३ सदरच्या फिरते वैद्यकीय कक्ष (Mobile Medical Unit) वाहनामध्ये डॉक्टर, परिचारक व मदतनीस उपलब्ध राहतील.

८.४ सदरचे फिरते वैद्यकीय कक्ष (Mobile Medical Unit) वाहन हे अत्याधुनिक जीवन समर्थन प्रणालीयुक्त (Advanced Life Support System) असावे.

८.५ सदरच्या फिरते वैद्यकीय कक्ष (Mobile Medical Unit) वाहनामध्ये लाभार्थ्यांना द्यावयाची औषधे, आपत्कालीन परिस्थितीमध्ये लागणारी अत्यावश्यक औषधे, प्रथमोपचार इ. सुविधा असणे आवश्यक आहे.

८.६ सदरचे फिरते वैद्यकीय कक्ष (Mobile Medical Unit) वाहन हे या योजनेकरीता तयार केलेल्या समर्पित बांधकाम कामगार आरोग्य क्रमांकाशी संलग्न राहील.

**९. समर्पित बांधकाम कामगार आरोग्य प्रणाली (Dedicated Software Management System)**

९.१ नियुक्त संस्था लाभार्थ्यांच्या प्राथमिक आरोग्य तपासणीपासून उपचारापर्यंत देण्यात येणाऱ्या सुविधांचे देखरेख व संनियंत्रण करण्याकरीता समर्पित बांधकाम कामगार आरोग्य प्रणाली (Dedicated Software Management System) मंडळाच्या नियंत्रणाखाली विनाशुल्क निर्माण करेल. या प्रणालीवरील होणारा खर्च नियुक्त संस्थेमार्फत भागविण्यात येईल. या योजनेबाबत नियुक्त संस्थेसोबतचा करार संपुष्टात आल्यानंतर सदर प्रणाली मंडळाकडे हस्तांतर करणे आवश्यक राहील.

९.२ सदर प्रणालीमध्ये सर्व प्रकारच्या नोंदी कायमस्वरूपी नोंदविण्यात येतील.

९.३ सदर प्रणालीद्वारे लाभार्थी स्वतःच्या नोंदीची माहिती उपलब्ध करून घेवू शकेल.

९.४ सदर प्रणालीद्वारे या योजनेतील सर्व प्रकारच्या देयकाचे संनियंत्रण करण्यात येईल.

**१०. समर्पित बांधकाम कामगार आरोग्य टोल फ्री क्रमांक (Dedicated Toll Free Number)**

१०.१ नियुक्त संस्था संपूर्ण राज्याकरीता एकच समर्पित बांधकाम कामगार आरोग्य टोल-फ्री क्रमांक (Dedicated Toll Free Number) म्हणून मंडळाच्या नियंत्रणाखाली विनाशुल्क निर्माण करेल. या टोल-फ्री क्रमांकावरील होणारा खर्च नियुक्त संस्थेमार्फत भागविण्यात येईल. या योजनेबाबत नियुक्त संस्थेसोबतचा करार संपुष्टात आल्यानंतर सदर टोल-फ्री क्रमांक मंडळाकडे हस्तांतर करणे आवश्यक राहील.

१०.२ नियुक्त संस्था कॉल सेंटर निर्माण करून संपूर्ण राज्यामधून येणाऱ्या कॉलचे संनियंत्रण करेल. तसेच त्यासाठी होणारा खर्च नियुक्त संस्थेमार्फत भागविण्यात येईल.

**११. संस्था नियुक्ती**

११.१ उपरोक्त परिच्छेद (१) ते (१०) अन्वये, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई अंतर्गत नोंदित सक्रिय (जिवित) बांधकाम कामगार यांचेकरीता "तपासणी ते उपचार आरोग्य योजना" राबविण्याकरीता एच.एल.एल. लाईफकेअर लि. (भारत सरकार उद्योग) यांची नियुक्ती करण्यात येत आहे.

११.२ एच.एल.एल. लाईफकेअर लि. (भारत सरकार उद्योग) यांचेमार्फत सदर योजना राबविण्याचा कालावधी हा सदर योजनेचा शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून ५ वर्षाचा राहील.

११.३ शासनाने यापूर्वी दिलेल्या मान्यता व सदर शासन निर्णयानुसार देण्यात येत असलेल्या मान्यता विचारात घेवून, मंडळाने एच.एल.एल. लाईफकेअर लि. (भारत सरकार उद्योग) यांच्याशी करारनामा करावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२३०८०७१४५३४३९८१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**( दा.सो.खताळ )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत:-**

१. मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य, यांचे सचिव राजभवन,मुंबई.
२. मा.सभापती, महाराषट्र विधानपरिषद, विधानमंडळ, मुंबई.
३. मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, विधानमंडळ, मुंबई.

४. मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. उप मुख्यमंत्री (गृह), मंत्रालय, मुंबई
६. मा. उप मुख्यमंत्री (वित्त व नियोजन), मंत्रालय, मुंबई
७. मा. मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
८. सर्व मा.मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
९. सर्व विधीमंडळ सदस्य
१०. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, यांचे सचिव राजभवन,मुंबई
११. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. प्रधान सचिव, विधानमंडळ, मुंबई.
१३. विकास आयुक्त, असंघटीत कामगार, मुंबई.
१४. कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१५. सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई.
१६. निवड नस्ती (कामगार-७)

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई अंतर्गत नोंदित सक्रिय (जिवित) बांधकाम कामगार यांचेकरीता "तपासणी ते उपचार आरोग्य योजना" राबविणेबाबत.-- शुध्दीपत्रक**

**महाराष्ट्र शासन**
**उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग**
**शासन शुध्दीपत्रक क्रमांक: इबांका-२०२३/प्र.क्र.७७/कामगार-७**
मंत्रालय मुंबई - ४०० ०३२
दिनांक: ०९ जानेवारी, २०२४

**वाचा :** (१) शासन निर्णय क्र.इबांका-२०२३/प्र.क्र.७७/कामगार-७, दिनांक ०७.०८.२०२३

(२) सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांचे पत्र क्र.जा.क्र.२०२३-आरोग्य-२०२३/प्र.क्र.०९/योजना-०६/२५२८/२०२४, दिनांक ०८.०१.२०२४

**शासन शुध्दीपत्रक :-**

शासन निर्णय दिनांक ०७.०८.२०२३ अन्वये महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई अंतर्गत नोंदीत सक्रिय (जिवित) बांधकाम कामगार यांचेकरीता "तपासणी ते उपचार आरोग्य योजना" राबविण्यास मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. सदर शासन निर्णयामधील परिच्छेद २ (क) पुढीलप्रमाणे आहे:-

२ (क) "सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दिनांक २८.०७.२०२३ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार नोंदीत सक्रिय (जिवित) बांधकाम कामगार अथवा त्याच्या कुटुंबातील पात्र व्यक्तींनी आरोग्य योजनेचा लाभ घेतला असल्यास त्यांना शासकीय योजनेची द्विरुक्ती टाळण्यासाठी या योजनेचा लाभ मिळणार नाही. मात्र, त्या बांधकाम कामगाराचा अथवा कुटुंबातील पात्र लाभार्थ्याच्या उपचारावरील खर्च रुपये ५.०० लक्षपेक्षा अधिक होणार असल्यास या योजनेच्या खर्चाच्या मर्यादेत नियुक्त संस्थेने महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या सहमतीने सूचीबद्ध केलेल्या रुग्णालयांमार्फत उपचाराकरीता सदर लाभार्थी पात्र राहील."

**त्याऐवजी परिच्छेद २ (क) पुढीलप्रमाणे वाचण्यात यावा:-**

२ (क) "महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई अंतर्गत नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगाराने सार्वजनिक आरोग्य विभागाची "महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना" अथवा कामगार विभागाची "तपासणी ते उपचार" आरोग्य योजना या दोन योजनांपैकी एक योजना निवडण्याचा विकल्प द्यावा. बांधकाम कामगारास दोन्ही योजनांचा लाभ घेता येणार नाही. एकदा बांधकाम कामगाराने पर्याय निवडल्यास, त्याच योजनेंतर्गत लाभ घेणे बंधनकारक ठरेल."

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या "महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य" योजनेचा पर्याय निवडणाऱ्या बांधकाम कामगारावर अन्य लाभार्थ्यांप्रमाणेच सार्वजनिक आरोग्य विभागाकडून मोफत उपचार करण्यात यावे.

२. सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२४०१०९१८०२४७६३१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(दा.सो.खताळ)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत:-**

१. मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य, यांचे सचिव राजभवन,मुंबई.
२. मा.सभापती, महाराषट्र विधानपरिषद, विधानमंडळ, मुंबई.
३. मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, विधानमंडळ, मुंबई.
४. मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. उप मुख्यमंत्री (गृह), मंत्रालय, मुंबई
६. मा. उप मुख्यमंत्री (वित्त व नियोजन), मंत्रालय, मुंबई
७. मा. मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
८. सर्व मा.मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
९. सर्व विधीमंडळ सदस्य
१०. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, यांचे सचिव राजभवन,मुंबई
११. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. प्रधान सचिव, विधानमंडळ, मुंबई.
१३. विकास आयुक्त, असंघटीत कामगार, मुंबई.
१४. कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१५. सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई.
१६. निवड नस्ती (कामगार-७)

"जनहिताय सर्वदा"

**महाराष्ट्र शासन**
उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

Email: labour7.ield-mh@nic.in

दिनांक : १० जुलै, २०२४

क्रमांक : इबांका-२०२३/प्र.क्र.७७ (भाग-१)/कामगार-७

प्रति,

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र इमारत व इतर कामगार कल्याणकारी मंडळ,
एमएमटीसी बिल्डींग, ई-ब्लॉक, सी- २२,वांद्रे-कुर्ला संकुल,
वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०००५१.

**विषय:-** महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळांतर्गत नोंदीत सक्रिय (जिवित) बांधकाम कामगारांकरीता **BOMT (Build Operate Manage Transfer** या तत्वावर रुग्णालय उभारणीद्वारे "तपासणी ते उपचार" ही योजना राबविण्याबाबत.

**संदर्भ:-** (१) उद्योग, ऊर्जा, कामगार विभाग शासन निर्णय क्र.इबांका-२०२३/प्र.क्र.७७/काम-७, दिनांक ०७.०८.२०२३

(२) सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांचे पत्र क्र. आरोग्य-२०२४/प्र.क्र.३५/ योजना-०६/६१८/२०२४, दिनांक १०.०७.२०२४

महोदय,

विषयाधीन प्रकरणी संदर्भाधीन पत्रान्वये महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळांतर्गत नोंदीत सक्रिय (जिवित) बांधकाम कामगारांकरीता **BOMT (Build Operate Manage Transfer)** या तत्वावर रुग्णालय उभारणीद्वारे "तपासणी ते उपचार" ही योजना राबविण्याबाबतचा प्रस्ताव मंडळाने शिफारशीसह शासन मान्यतेस्तव सादर केलेला आहे.

२. त्यास अनुसरुन महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळांतर्गत नोंदीत सक्रिय (जिवित) बांधकाम कामगारांकरीता **BOMT (Build Operate Manage Transfer)** या तत्वावर रुग्णालय उभारणीद्वारे "तपासणी ते उपचार" ही योजना राबविण्याबाबतच्या मंडळाच्या प्रस्तावास तत्वत: मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

३. या प्रस्तावाच्या अनुषंगाने एच.एस.सी.सी. (इंडिया) लिमिटेड (भारत सरकार उद्योग) या संस्थेसोबत मंडळामार्फत सामंजस्य करार (MoU) करण्यास मान्यता देण्यात येत आहे. त्यानुषंगाने आवश्यक ती कार्यवाही मंडळ स्तरावरुन करण्यात यावी.

४. सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांनी सदर योजना क्षेत्रीय स्तरावर राबविताना यापूर्वीच्या संदर्भीय शासन निर्णयाद्वारे मान्यता

दिलेल्या (एच.एल.एल.लाईफकेअर लिमिटेड) व आता याद्वारे मान्यता देण्यात आलेल्या (एच.एस.सी.सी. (इंडीया) लिमिटेड) या दोन्ही संस्थांशी समन्वय साधून अंमलबजावणीची सविस्तर कार्यपद्धती निश्चित करावी.

आपला,

( दिपक पोकळे )
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत:- निवडनस्ती (कामगार-७)

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई अंतर्गत नोंदित सक्रिय (जिवित) बांधकाम कामगार व कुटुंबिय यांचेकरीता BOMT (Build Operate Manage Transfer) या तत्वावर रूग्णालय उभारणीद्वारे "तपासणी ते उपचार आरोग्य योजना" राबविणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: इबाका-०५२३/प्र.क्र.७७ (भाग-१)/कामगार- ७**
मंत्रालय मुंबई - ४०० ०३२
दिनांक: १२ जुलै, २०२४.

**वाचा :-**

१. उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचा शासन निर्णय क्रमांक इबांका-२०२३/प्र.क्र.७७/कामगार-७, दिनांक ०७ ऑगस्ट, २०२३.

२. उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचा शासन निर्णय क्रमांक इबांका-२०२३/प्र.क्र.७७/कामगार-७, दिनांक ०९ जानेवारी, २०२४.

३. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या दिनांक ०२ जुलै, २०२४ रोजीच्या बैठकीमधील ठराव क्र. (६०) (३५).

४. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचे पत्र क्र. आरोग्य-२०२४/प्र.क्र.३५/योजना-०६/६१८/२०२४, दिनांक १० जुलै,२०२४.

५. उद्योग,ऊर्जा व कामगार विभागाचे पत्र क्र.इबांका-०५२३/प्र.क्र.७७ (भाग-१)/कामगार-७, दिनांक १० जुलै, २०२४.

**प्रस्तावना : -**

इमारत व इतर बांधकाम व्यवसायामधील कामगारांच्या हिताचे रक्षण करण्याच्या दृष्टीने, केंद्र शासनाने इमारत व इतर बांधकाम कामगार अधिनियम (रोजगार नियमन व सेवाशर्थी), १९९६ लागू केला आहे. सदर अधिनियमामधील कलम (१८) नुसार महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्थी) नियम, २००७ अस्तित्वात आले असून, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची स्थापना करण्यात आलेली आहे. अधिनियमामधील तरतूदीनुसार बांधकाम कामगारांची नोंदणी व नुतणीकरण करण्यात येते.बांधकाम

कामगारांचे काम हे कष्टपुर्ण असल्याने त्यांना आरोग्याच्या समस्या प्रकर्षाने उद्भवण्याची दाट शक्यता असते. वेळोवेळी त्यांच्या आरोग्याच्या तपासण्या झाल्यास भविष्यात उद्भवणा-या आरोग्याच्या समस्यांवर प्राथमिक स्तरावर उपचार करणे शक्य होईल याद्दष्टीने, संदर्भाधीन क्र.(१) व (२) अन्वये एच.एल.एल. लाईफकेअर लि. (भारत सरकार उद्योग) यांचे मार्फत "तपासणी ते उपचार आरोग्य योजना" राबविण्यास मान्यता देण्यात आली होती. संदर्भाधीन क्र. (३) नुसार BOMT (Build Operate Manage Transfer) या तत्वावर मे. एचएससीसी ( इंडिया) लि. यांचे मार्फत आरोग्य तपासणी केंद्र व हॉस्पिटल उभारणी करण्याचा ठराव पारीत करण्यात आला आहे. त्याअनुषंगाने, BOMT (Build Operate Manage Transfer) या तत्वावर रूग्णालय उभारणीद्वारे "तपासणी ते उपचार" योजना राबविण्याचा प्रस्ताव संदर्भाधीन क्र. (४) अन्वये शासनास सादर केला होता, त्यास संदर्भाधीन क्र. (५) अन्वये तत्वत: मान्यता प्रदान करण्यात आली आहे. सबब, सदर योजना राबविण्यास व त्याबाबतच्या सर्वसमावेशक सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय:-</u>**

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई अंतर्गत नोंदित सक्रिय (जिवित) बांधकाम कामगार व कुटुंबिय यांचेकरीता BOMT (Build Operate Manage Transfer) या तत्वावर रूग्णालय उभारणीद्वारे "तपासणी ते उपचार आरोग्य योजना" राबविण्यास सदर शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

२. **<u>योजनेचे लाभार्थी :-</u>**

(अ) सदर योजनेअंतर्गत सर्व नोंदित सक्रिय (जिवित) बांधकाम कामगार तसेच, त्यांच्या कुटुंबामधील पती अथवा पत्नी व १० वर्षावरील प्रथम दोन अपत्ये ही लाभार्थी म्हणून गणण्यात येतील.

(ब) सदर योजनेअंतर्गत सक्रिय (जिवित) नोंदणी कालावधीमध्ये वर्षातून एकदा सदर योजनेच्या लाभासाठी लाभार्थी पात्र राहील.

(क) महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ,मुंबई अंतर्गत नोंदित सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगाराने सार्वजनिक आरोग्य विभागाची "महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना"अथवा कामगार विभागाची "तपासणी ते उपचार" आरोग्य योजना या दोन योजनांपैकी एक योजना निवडण्याचा विकल्प द्यावा.बांधकाम कामगारास दोन्ही योजनांचा लाभ घेता येणार नाही.एकदा बांधकाम कामगाराने पर्याय निवडल्यास, त्याच योजनेअंतर्गत लाभ घेणे बंधनकारक ठरेल.

(ड) सदरची योजना मंडळाकडे नोंदित सक्रिय (जिवित) बांधकाम कामगारांकरीता ऐच्छिक स्वरूपाची राहील.

## ३. अंमलबजावणी यंत्रणा व आर्थिक तरतूद :-

(अ) सदरची योजना महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांच्या मार्फत, जिल्हा कामगार सुविधा केंद्र या घटका मार्फत राबविण्यात येईल.

(ब) मंडळाकडे जमा होणा-या उप करामधून सदर योजनेवरील खर्च भागविण्यात येईल.

(क) सदर योजनेच्या संनियंत्रणाकरीता मंडळाच्या स्तरावर प्रकल्प अंमलबजावणी समिती (PMC) गठीत करण्यात यावी.

(ड) योजनेवर होणा-या खर्चाच्या २% खर्च प्रशासकीय खर्च म्हणून मंडळास अनुज्ञेय राहील.

## ४. योजनेचे टप्पे :-

सदरची योजना खालील तीन टप्प्यामध्ये राबविण्यात येईल.

### (अ) प्राथमिक आरोग्य तपासणी चाचणी

अ.१ - तपासणी पूर्व आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन (Pre-Health Camp) -

नियुक्त संस्था, जिल्हा कामगार सुविधा केंद्राचे प्रमुख कामगार उपायुक्त/सहायक कामगार आयुक्त/सरकारी कामगार अधिकारी यांच्या मान्यतेने शिबीराची ठिकाणे, दिनांक व वेळ निश्चित करतील.

अ.२- आरोग्य तपासणी शिबीरामधील उपक्रम -

अ.२.१ नियुक्त संस्था, शिबीराकरीता निश्चित केलेल्या लाभार्थ्यांना एकत्रित करतील व त्यांची नोंदणी करण्यात येईल.

अ.२.२ नियुक्त संस्था, शिबीरामध्ये आवश्यकतेनुसार डॉक्टर व वैद्यकीय सहाय्यक उपलब्ध करून देतील.

अ.२.३ शिबीरामध्ये लाभार्थ्यांची शारीरीक तपासणी करण्यात येईल व त्यांच्या पूर्व आजार तथा वैद्यकीय इतिहासाबाबत माहिती नोंदविण्यात येईल.

अ.२.४ शिबीरामध्ये नियुक्त संस्थेमार्फत लाभार्थ्यांच्या तपासणीसाठीचे नमुने (Samples) गोळा करण्यात येतील.

अ.२.५ बांधकाम कामगारांच्या करावयाच्या प्राथमिक आरोग्य तपासणी चाचण्या ह्या वरील नमूद शिबीरामध्ये अथवा बांधकाम कामगारांच्या घरोघरी जाऊन नियुक्त संस्थेकडून करण्यात येतील.

अ.३- प्रयोगशाळेमधील तपासणी -

अ.३.१ शिबीरामध्ये अथवा बांधकाम कामगारांच्या घरोघरी जाऊन लाभार्थ्यांच्या प्राथमिक आरोग्य तपासण्यांच्या नमुन्यांच्या (Samples) अनुषंगाने करावयाच्या चाचण्या शासनाच्या मान्यतेने निश्चित करण्यात येतील.

अ.३.२ चाचण्यांचे दर हे CGHS (Central Government Health Scheme) च्या दराच्या मर्यादेत राहतील.

अ.४ - तपासणी नंतर सल्लामसलत (Consultation) शिबीराचे आयोजन (Post-Health Camp) -

अ.४.१ लाभार्थ्यांच्या आरोग्य तपासणीचे अहवाल प्राप्त झाल्यानंतर नियुक्त संस्थेमार्फत तपासणीनंतर सल्लामसलत (Consultation) शिबीराचे (Post-Health Camp) आयोजन करण्यात येईल.

अ.४.२ सदर शिबीरामध्ये तपासणी अहवालाचे वितरण लाभार्थ्यांना करण्यात येईल.

अ.४.३ तपासणी अहवालाच्या अनुषंगाने लाभार्थ्यांचे डॉक्टरांसोबत सल्लामसलत (Consultation) करण्यात येईल.

अ.४.४ तपासणी अहवाल, लाभार्थ्यांना नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर पाठविण्यात येईल. तसेच, संगणक प्रणालीमध्ये उपलब्ध करून देण्यात येईल.

अ.४.५ प्राथमिक आरोग्य तपासणी चाचणीमध्ये सामान्य अहवाल (Normal Report) असलेल्या लाभार्थ्यांची पुढील कार्यवाही (Case) बंद करण्यात येईल.

अ.४.६ प्राथमिक आरोग्य तपासणी चाचणीमध्ये असामान्य अहवाल (Abnormal Report) असलेल्या लाभार्थ्यांस आवश्यकतेनुसार लाभार्थ्यांच्या सहमतीने औषधोपचाराची शिफारस करण्यात येईल अथवा प्रगत पुष्ठीकरण आरोग्य तपासणी चाचणी (Advanced Confirmatory Test) करीता सूचविण्यात येईल.

**(ब) प्रगत पुष्ठीकरण आरोग्य तपासणी चाचणी (Advanced Confirmatory Test)**

ब.१. प्राथमिक आरोग्य तपासणी चाचणीमधील ज्या चाचणीचा अहवाल असामान्य (Abnormal Report) असेल अशा चाचणीची दुबार चाचणी करण्याची मागणी लाभार्थ्यांने केल्यास, नियुक्त संस्था विनाशुल्क एकवेळेस अशी चाचणी करेल.

ब.२ प्राथमिक आरोग्य तपासणी चाचणीमध्ये असामान्य अहवाल (Abnormal Report) असलेल्या लाभार्थ्यांची सहमती असल्यास त्यास प्रगत पुष्ठीकरण आरोग्य तपासणी चाचणी (Advanced Confirmatory Test) करीता शिफारस करण्यात येईल.

ब.३ नियुक्त संस्थेने सूचीबद्ध (Empanelled) केलेल्या रूग्णालयामध्ये/तपासणी प्रयोगशाळांमध्ये/सूचीबद्ध (Empanelled) प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये प्रगत पुष्ठीकरण आरोग्य तपासणी चाचणी (Advanced Confirmatory Test) करण्यात येईल.

ब.४ प्रगत पुष्ठीकरण आरोग्य तपासणी चाचण्या (Advanced Confirmatory Test) ह्या केवळ जिवीतास धोका निर्माण करणाऱ्या आजाराच्या (Life Threatening Diseases) बाबतीत करावयाच्या चाचण्या शासन मान्यतेने निश्चित करण्यात येतील.

ब.५ चाचण्यांचे दर हे CGHS (Central Government Health Scheme) च्या दराच्या मर्यादेत राहतील.

ब.६ प्रगत पुष्ठीकरण आरोग्य तपासणी चाचणीमध्ये (Advanced Confirmatory Test) सामान्य अहवाल (Normal Report) असलेल्या लाभार्थ्यांची पुढील कार्यवाही (Case) बंद करण्यात येईल.

ब.७ प्रगत पुष्ठीकरण आरोग्य तपासणी चाचणीमध्ये (Advanced Confirmatory Test) असामान्य अहवाल (Abnormal Report) असलेल्या लाभार्थ्यांस, आवश्यकतेनुसार लाभार्थ्याच्या सहमतीने औषधोपचाराची शिफारस करण्यात येईल अथवा उपचाराकरीता सूचिबद्ध रूग्णालयामध्ये भरती करण्यात येईल.

**(क) वैद्यकीय उपचार**

(क-१) **औषधोपचार**

क-१.१ प्राथमिक आरोग्य तपासणी चाचणीमध्ये तसेच, प्रगत पुष्ठीकरण आरोग्य तपासणी चाचणीमध्ये (Advanced Confirmatory Test) असामान्य अहवाल (Abnormal Report) असलेल्या लाभार्थ्यांस आवश्यकतेनुसार लाभार्थ्याच्या सहमतीने औषधोपचार करण्यात येईल.

क-१.२ सदर योजनेअंतर्गत केंद्र शासनाच्या जन औषधी/अम्रित (AMRIT) योजनेअंतर्गत निश्चित केलेल्या दराच्या मर्यादेत औषधांचा पुरवठा लाभार्थ्यांना करेल.

क-१.३ सदर योजनेअंतर्गत प्रति लाभार्थी (जिवित सक्रिय नोंदणी कालावधी) प्रति वर्ष रक्कम रू. ५,०००/- च्या मर्यादेत नियुक्त संस्था औषधांचा पुरवठा करेल.

(क-२) **रूग्णालय भरती**

क-२.१ प्रगत पुष्ठीकरण आरोग्य तपासणी चाचणीमध्ये (Advanced Confirmatory Test) असामान्य अहवाल (Abnormal Report) असलेल्या लाभार्थ्यांस, त्याच्या सहमतीने उपचाराकरीता संस्थेने सूचीबद्ध (Empanelled) केलेल्या रूग्णालयामध्ये भरती करण्यात येईल.

क-२.२ लाभार्थीवर उपचार करण्यात येणारी रूग्णालये ही नियुक्त संस्थेकडे सूचीबद्ध असणे आवश्यक राहील.

क-२.३ रूग्णालयामध्ये लाभार्थ्यास भरती केल्यानंतर त्याची नोंदणी करण्यात (Admission) यावी तसेच, उपचाराअंती Discharge Paper व झालेला एकूण खर्च याच्या नोंदी नियुक्त संस्थेमार्फत संगणक प्रणालीवर ठेवण्यात येतील.

क-२.४ उपचारावर झालेल्या खर्चाच्या रक्कम रू.२.०० लक्ष च्या मर्यादेमध्ये रूग्णालयास नियुक्त संस्थेकडून अदायगी करण्यात येईल व सदर रकमेची प्रतिपुर्ती मंडळाकडून नियुक्त संस्थेस करण्यात येईल.

क-२.५ विशिष्ठ आजाराच्या प्रकरणी उपचाराचा खर्च रक्कम रू.२.०० लक्ष पेक्षा जास्त मात्र रु.७.०० लक्ष च्या मर्यादेत होणार असल्यास, संबधित रूग्णालयाच्या वैद्यकीय प्रमुख यांची शिफारस तसेच, जिल्हा कामगार सुविधा केंद्राचे प्रमुख कामगार उप आयुक्त / सहायक कामगार आयुक्त / सरकारी कामगार अधिकारी यांच्या मान्यतेने व संबधित जिल्ह्याच्या शासकीय रूग्णालयाचे अधिष्ठाता यांच्या शिफारशीने अशी प्रकरणे "बांधकाम कामगार आरोग्य समिती" कडे सादर करण्यात यावीत.

क-२.६ सदर योजनेअंतर्गत नोंदित जिवीत (सक्रिय) बांधकाम कामगार व त्यांच्या कुंटुबांमधील (अवलंबितामधील) यथास्थिती पती/पत्नी आणि त्यांची दोन अविवाहित १० वर्षावरील अपत्ये असे एकूण चार

घटक पात्र राहतील. प्रत्येक घटकावरील उपचाराची खर्च मर्यादा किमान रू.२.०० लक्ष ते मान्यतेनुसार कमाल रू.७.०० लक्ष प्रतिवर्ष राहील व सदर खर्चाच्या मर्यादेतच प्रत्येक घटक वर्षातून कितीही वेळा लाभ घेवू शकेल.यानुसार कुटुंबावरील प्रतिवर्ष खर्चाची मर्यादा किमान रू.८.०० लक्ष ते किमान रू.२८.०० लक्ष जरी असली तरी,प्रत्येक घटकास प्रतिवर्ष किमान रू.२.०० लक्ष ते मान्यतेनुसार कमाल रू.७.०० लक्ष मर्यादेच उपचारास पात्र राहतील.

क-२.७ शासनाच्या दिनांक ०७ फेब्रुवारी, २०२४ रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने, सदर योजनेअंतर्गत नोंदित जिवीत (सक्रिय) बांधकामाची १० वर्षाखालील अपत्याचा अपघात झाल्यास अथवा आजारी पडल्यास त्यावरील खर्चाची प्रतिपूर्ती अनुज्ञेय राहील.

## ५. बांधकाम कामगार आरोग्य समिती :-

(अ) मंडळाकडील नोंदित सक्रिय (जिवित) बांधकाम कामगारांच्या उपचाराकरीता रक्कम रू.२.०० लक्षपेक्षा जास्त होणाऱ्या मात्र रक्कम रू. ७.०० लक्षच्या मर्यादेत मान्यता देण्याकरीता खालीलप्रमाणे बांधकाम कामगार आरोग्य समितीचे गठण करण्यात येत आहे:-

१. अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई ---- अध्यक्ष

२. प्रधान सचिव (कामगार), उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई ---- सदस्य

३. कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य ---- सदस्य

४. अधिष्ठाता, सर जे.जे. रूग्णालय ,मुंबई अथवा त्यांनी नामनिर्देशित केलेले वरीष्ठ वैद्यकीय अधिकारी ---- सदस्य

५. सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई ---- सदस्य सचिव

(ब) सदर समितीसमोर प्राप्त होणाऱ्या प्रस्तावावर निर्णय घेवून उपचार खर्च अनुज्ञेय करण्यात येईल.

## ६. अपघातप्रकरणी वैद्यकीय सहाय्य

६.१ बांधकामाच्या ठिकाणी नोंदित सक्रिय (जिवित) बांधकाम कामगारास अपघात झाल्यास ती व्यक्ती सदर योजनेअंतर्गत उपचारास पात्र राहील.

६.२. बांधकाम कामगारास आवश्यकतेनुसार व सोईनुसार ज्या रूग्णालयामध्ये उपचाराकरीता भरती केले असेल, असे रूग्णालय खाजगी असल्यास तात्पुरत्या स्वरूपात सूचीबद्ध (Empanelled) करून पुढील उपचार नियुक्त संस्थेने करावेत.

६.३ अपघातानंतर उपचाराकरीता असलेल्या रूग्णालयाची माहिती लाभार्थी/कामाची आस्थापना/नातेवाईक/इतर व्यक्तींनी नियुक्त संस्थेस टोल फ्री क्रमांकावर अथवा जिल्हा/तालुका कामगार सुविधा केंद्रास देणे आवश्यक राहील.

६.४ अपघातावरील उपचाराचा खर्च परिच्छेद ४ (क-२.४) , ४ (क-२.५) व ४ (क-२.६) अन्वये अनुज्ञेय राहील.

## ७. सूचीबद्ध (Empanelled) रूग्णालये

७.१ स्थिर आरोग्य तपासणी केंद्रे-

नियुक्त संस्थेने, प्रत्येक तालुक्यात किमान एक याप्रमाणे निश्चित ठिकाणी कायमस्वरूपी आरोग्य तपासणी केंद्रे निर्माण करावीत किंवा सूचीबद्ध (Empanelled) करण्यात यावे. अशा ठिकाणी लाभार्थी भेट देवून प्राथमिक आरोग्य तपासणी करू शकेल व तपासणी अहवाल (प्राथमिक व प्रगत पुष्ठीकरण) मिळवू शकेल.

७.२ पुष्ठीकरण आरोग्य तपासणी चाचणी (Advanced Confirmatory Test) तसेच, वैद्यकीय उपचाराकरीता नियुक्त संस्था रूग्णालये सूचीबद्ध (Empanelled) करतील.

७.३ प्रत्येक जिल्हा कामगार सुविधा केंद्राच्या क्षेत्रामध्ये किमान तीन रूग्णालये मंडळाच्या मान्यतेने सूचीबद्ध (Empanelled) करण्यात यावीत. तथापि, आवश्यकतेनुसार यामध्ये वाढ करण्यात यावी.

## ८. फिरते वैद्यकीय कक्ष (Mobile Medical Unit - MMU)

८.१ नियुक्त संस्थेमार्फत प्रत्येक जिल्हा कामगार सुविधा केंद्राच्या क्षेत्रामध्ये २४ x ७ कार्यरत राहील, असे किमान एक फिरते वैद्यकीय कक्ष (Mobile Medical Unit) वाहन स्वरूपामध्ये उपलब्ध करून देणे आवश्यक राहील. तथापि, आवश्यकतेनुसार यामध्ये वाढ करण्यात यावी. या कक्षावरील होणारा खर्च नियुक्त संस्थेमार्फत भागविण्यात येईल. या योजनेबाबत नियुक्त

संस्थेसोबतचा करार संपुष्टात आल्यानंतर ती वाहने मंडळाकडे हस्तांतर करणे आवश्यक राहील.

८.२ नियुक्त संस्थेमार्फत फिरते वैद्यकीय कक्ष (Mobile Medical Unit) वाहन हे विनाशुल्क उपलब्ध करून देणे आवश्यक राहील.

८.३ सदरच्या फिरते वैद्यकीय कक्ष (Mobile Medical Unit) वाहनामध्ये डॉक्टर, परिचारक व मदतनीस उपलब्ध राहतील.

८.४ सदरचे फिरते वैद्यकीय कक्ष (Mobile Medical Unit) वाहन हे अत्याधुनिक जीवन समर्थन प्रणालीयुक्त (Advanced Life Support System) असावे.

८.५ सदरच्या फिरते वैद्यकीय कक्ष (Mobile Medical Unit) वाहनामध्ये लाभार्थ्यांना द्यावयाची औषधे, आपत्कालीन परिस्थितीमध्ये लागणारी अत्यावश्यक औषधे, प्रथमोपचार इ. सुविधा असणे आवश्यक आहे.

८.६ सदरचे फिरते वैद्यकीय कक्ष (Mobile Medical Unit) वाहन हे या योजनेकरीता तयार केलेल्या समर्पित बांधकाम कामगार आरोग्य क्रमांकाशी संलग्न राहील.

**९. समर्पित बांधकाम कामगार आरोग्य प्रणाली (Dedicated Software Management System)**

९.१ नियुक्त संस्था लाभार्थ्यांच्या प्राथमिक आरोग्य तपासणीपासून उपचारापर्यंत देण्यात येणाऱ्या सुविधांचे देखरेख व संनियंत्रण करण्याकरीता समर्पित बांधकाम कामगार आरोग्य प्रणाली (Dedicated Software Management System) मंडळाच्या नियंत्रणाखाली विनाशुल्क निर्माण करेल. या प्रणालीवरील होणारा खर्च नियुक्त संस्थेमार्फत भागविण्यात येईल. या योजनेबाबत नियुक्त संस्थेसोबतचा करार संपुष्टात आल्यानंतर सदर प्रणाली मंडळाकडे हस्तांतर करणे आवश्यक राहील.

९.२ सदर प्रणालीमध्ये सर्व प्रकारच्या नोंदी कायमस्वरूपी नोंदविण्यात येतील.

९.३ सदर प्रणालीद्वारे लाभार्थी स्वत:च्या नोंदीची माहिती उपलब्ध करून घेवू शकेल.

९.४ सदर प्रणालीद्वारे या योजनेतील सर्व प्रकारच्या देयकाचे संनियंत्रण करण्यात येईल.

**१०. समर्पित बांधकाम कामगार आरोग्य टोल फ्री क्रमांक (Dedicated Toll Free Number)**

१०.१ नियुक्त संस्था संपूर्ण राज्याकरीता एकच समर्पित बांधकाम कामगार आरोग्य टोल-फ्री क्रमांक (Dedicated Toll Free Number) म्हणून मंडळाच्या नियंत्रणाखाली विनाशुल्क निर्माण करेल. या टोल-फ्री क्रमांकावरील होणारा खर्च नियुक्त संस्थेमार्फत भागविण्यात येईल. या योजनेबाबत नियुक्त संस्थेसोबतचा करार संपुष्टात आल्यानंतर सदर टोल-फ्री क्रमांक मंडळाकडे हस्तांतर करणे आवश्यक राहील.

१०.२ नियुक्त संस्था कॉल सेंटर निर्माण करून संपूर्ण राज्यामधून येणाऱ्या कॉलचे संनियंत्रण करेल. तसेच त्यासाठी होणारा खर्च नियुक्त संस्थेमार्फत भागविण्यात येईल.

**११. <u>व्यावसायिक आरोग्य केंद्राची उभारणी (Occupational Health Centre) –</u>**

कामाच्या ठिकाणी आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन करणे, घरोघरी जावून आरोग्य तपासण्या करणे इ. करीता अनुभवी वैद्यकीय व्यवसाय करणा-या व्यक्तीच्या निगराणीखाली व्यावसायिक आरोग्य केंद्र खालीलप्रमाणे उभारणी करण्यात यावी -

- <u>जिल्हा व्यावसायिक आरोग्य केंद्र</u>

जिल्हामधील लाभार्थ्यांची वार्षिक प्राथमिक आरोग्य तपासणी करण्याकरीता प्रत्येक जिल्हा बांधकाम कामगार रूग्णालयामध्ये जिल्हा व्यावसायिक आरोग्य केंद्राची उभारणी करण्यात यावी.

- <u>विभागीय व्यावसायिक आरोग्य केंद्र</u>

विभागीय स्तरावर प्रत्येक विभागीय बांधकाम कामगार रूग्णालयामध्ये विभागीय व्यावसायिक आरोग्य केंद्राची उभारणी करण्यात यावी.

- <u>राज्यस्तरीय व्यावसायिक आरोग्य केंद्र</u>

राज्यस्तरीय बांधकाम कामगार रूग्णालयामध्ये राज्यस्तरीय व्यावसायिक आरोग्य केंद्राची उभारणी करण्यात यावी.

**१२. <u>बांधकाम कामगार रूग्णालय –</u>**

सर्व वैद्यकीय सोई सुविधांनी युक्त-नॅशनल अ‍ॅक्रेडिएशन बोर्ड फॉर हॉस्पिटल्स अ‍ॅन्ड हेल्थ केअर प्रोव्हायडर्स (NATIONAL ACCREDITATION BOARD FOR HOSPITALS & HEALTHCARE PROVIDERS) (NABH) ने निश्चित केलेल्या गुणवत्ता निकषानुसार बांधकाम कामगार रूग्णालयाची उभारणी खालीलप्रमाणे उभारणी करण्यात यावी.

➢ **जिल्हा बांधकाम कामगार रूग्णालय –**

दुय्यम काळजी दर्जाची (Secondary Care) ५० पेक्षा जास्त खाटांच्या क्षमतेचे प्रत्येक जिल्ह्यामध्ये एक रूग्णालय उभारण्यात यावे.

➢ विभागीय बांधकाम कामगार रूग्णालय

अत्याधुनिक दर्जाची (Multi-Specialty) ७५-१०० खाटांच्या क्षमतेचे प्रत्येक विभागामध्ये एक रूग्णालय उभारण्यात यावे.

➢ राज्यस्तरीय बांधकाम कामगार रूग्णालय

अत्याधुनिक दर्जाची (Multi-Specialty) १०० पेक्षा जास्त खाटांच्या क्षमतेचे राज्य स्तरावर एक रूग्णालय उभारण्यात यावे.

सदर रूग्णालयात उपचाराकरीता भरती झाल्यानंतर,परि. (४) (क)-२.५ मध्ये नमूद केलेल्या शासकीय रूग्णालयाचे अधिष्ठाता यांचे ऐवजी संबधित बांधकाम कामगार रूग्णालयाचे अधिष्ठाता हे "बांधकाम कामगार आरोग्य समिती" कडे शिफारस करण्यास प्राधिकृत राहतील.

**१३. माहिती व्यवस्थापन प्रणाली –**

सदर प्रकल्पाअंतर्गत निर्माण होणारे सर्व अहवाल जतन करण्याकरीता माहिती व्यवस्थापन प्रणाली निर्माण करण्यात यावी.

**१४. लाभार्थी व खर्चाची प्रतिपूर्ती –**

सदर योजनेअंतर्गत केंद्र शासन आरोग्य योजना (CGHS) दरानुसार उपचाराचे दर राहतील व औषधांचा पुरवठा जन-औषधी दरानुसार होईल.संदर्भाधीन क्र.(१) व (२) अन्वये मान्यता देण्यात आलेली "तपासणी ते उपचार आरोग्य योजना" योजनेअंतर्गत परि.(२) अन्वये निश्चित केलेले लाभार्थी पात्र राहतील.तथापि, परि.(११) ते (१३) अन्वये सुरू करण्यात येत असलेल्या BOMT (Build Operate Manage Transfer) या तत्वावर रूग्णालय उभारणीद्वारे "तपासणी ते उपचार आरोग्य योजना" या योजनेअंतर्गत परि.(२) अन्वये निश्चित केलेले लाभार्थी तसेच, असंघटीत कामगारसुद्धा लाभार्थी राहतील. परि.(२) अन्वये निश्चित केलेल्या लाभार्थी करीता खर्चाची प्रतिपूर्ती महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांच्याकडून करण्यात येईल. तथापि, असंघटीत कामगार होणाऱ्या खर्चाची प्रतिपूर्ती महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांच्याकडून होणार नाही,त्याकरीता केंद्र शासन/राज्य शासनाच्या अन्य योजनांमधून खर्चाची प्रतिपूर्ती करून घेण्याची जबाबदारी नियुक्त संस्थेची राहील. सदर योजनेअंतर्गत केंद्र शासन आरोग्य योजना (CGHS) दरानुसार उपचाराचे दर राहतील व औषधांचा पुरवठा जन-औषधी दरानुसार होईल.

## १५. <u>संस्था नियुक्ती</u>

१५.१ संदर्भाधीन क्र.(१) व (२) अन्वये मान्यता देण्यात आलेली परि.(१) ते (१०) अन्वये केवळ “तपासणी ते उपचार आरोग्य योजना” राबविण्यास एच.एल.एल. लाईफकेअर लि. (भारत सरकार उद्योग) यांची करण्यात आलेली नियुक्ती कायम ठेवण्यात येत आहे.

१५.२ क्र.(१) व (२) अन्वये मान्यता देण्यात आलेली परि.(१) ते (१०) अन्वये “तपासणी ते उपचार आरोग्य योजना” तसेच, उपरोक्त परिच्छेद (११) ते (१४) अन्वये, BOMT (Build Operate Manage Transfer) या तत्वावर रूग्णालय उभारणीद्वारे “तपासणी ते उपचार आरोग्य योजना” राबविण्यास एच.एस.सी.सी. (इंडिया) लिमिटेड (भारत सरकार उद्योग) यांची नियुक्ती करण्यात येत आहे.

## १६. <u>योजना अंलबजावणीचा कालावधी –</u>

१६.१ संदर्भाधीन क्र.(१) व (२) अन्वये मान्यता देण्यात आलेली “तपासणी ते उपचार आरोग्य योजना”राबविण्याचा एच.एल.एल. लाईफकेअर लि. (भारत सरकार उद्योग) यांचा कालावधी दिनांक ०८ जानेवारी, २०२९ अखेर राहील.

१६.२ क्र.(१) व (२) अन्वये मान्यता देण्यात आलेली “तपासणी ते उपचार आरोग्य योजना” तसेच, उपरोक्त परिच्छेद (११) ते (१४) अन्वये, BOMT (Build Operate Manage Transfer) या तत्वावर रूग्णालय उभारणीद्वारे “तपासणी ते उपचार आरोग्य योजना” राबविण्याचा एच.एस.सी.सी. (इंडिया) लिमिटेड (भारत सरकार उद्योग) यांचा कालावधी दिनांक ०८ जानेवारी, २०५९ अखेर राहील.

१६.३ सदर योजनेअंतर्गत एच.एस.सी.सी. (इंडिया) लिमिटेड (भारत सरकार उद्योग) यांनी प्रथमच्या अंदाजे ५ वर्षाच्या कालावधीमध्ये (दिनांक ०८.०१.२०२९ अखेर) रूग्णालय व तद्अनुषंगिक बाबींची उभारणी करण्यात यावी. तद्नंतर प्रकल्प अंमलबजावणी कालावधी ३० वर्षाचा (दिनांक ०९.०१.२०२९ ते दिनांक ०८.०१.२०५९) राहील. याकरीता होणारा सर्व खर्च एच.एस.सी.सी. (इंडिया) लिमिटेड (भारत सरकार उद्योग) यांच्याकडून करण्यात येईल व प्रकल्प कालावधी संपुष्टात आल्यानंतर संपुर्ण मालमत्ता (सर्व स्तरावरील रूग्णालयाची स्थावर जंगम वैद्यकीय सोई-सुविधांसह) आहे त्या स्वरूपात मंडळाकडे विनामुल्य वर्ग करण्यात येईल. यामध्ये मुष्यबळ वर्ग होणार नाही. स्थावर, जंगम व वैद्यकीय सोई-सुविधा करीता कोणत्याही खर्चाची प्रतिपूर्ती मंडळाकडून एच.एस.सी.सी. (इंडिया) लिमिटेड (भारत सरकार उद्योग) यांच्याकडून होणार नाही.

**१७. <u>योजना अंमलबजावणीकरीता समन्वयक -</u>**

एच.एल.एल. लाईफकेअर लि. (भारत सरकार उद्योग) व एच.एस.सी.सी. (इंडिया) लिमिटेड (भारत सरकार उद्योग) यांच्याकडून सदर योजना राबविण्यात येत असल्याने समन्वयाकरीता एच.एस.सी.सी. (इंडिया) लिमिटेड (भारत सरकार उद्योग) यांची “समन्वयक” म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे.

**१८.** एच.एल.एल. लाईफकेअर लि. (भारत सरकार उद्योग) यांचेमार्फत निर्माण केलेले फिरते वैद्यकीय कक्ष (Mobile Medical Unit), समर्पित बांधकाम आरोग्य प्रणाली (Dedicated Software Management System) व समर्पित बांधकाम कामगार आरोग्य टोल फ्री क्रमांक (Dedicated Toll Free Number) या बाबी संबधित संस्थेने करार कालावधीनंतर या बाबी मंडळाकडे हस्तातंरीत करावयाच्या आहेत.

**१९.** सदरची योजना क्षेत्रीय स्तरावर राबविण्याकरीता एच.एल.एल. लाईफकेअर लि. (भारत सरकार उद्योग) व एच.एस.सी.सी. (इंडिया) लिमिटेड (भारत सरकार उद्योग) यांच्याशी समन्वय साधून अंमलबजावणीची सविस्तर कार्यपद्धती सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**२०.** एच.एल.एल. लाईफकेअर लि. (भारत सरकार उद्योग) यांच्यासोबत यापूर्वी करण्यात आलेला करारनामा वैध राहील. संदर्भाधीन क्र. (५) अन्वये देण्यात आलेल्या मान्यतेनुसार एच.एस.सी.सी. (इंडिया) लिमिटेड (भारत सरकार उद्योग) यांच्याशी सामंजस्य करार (MoU) करण्यात यावा.त्यानुसार सुधारीत कार्यारंभ आदेश देण्यात यावेत.

**२१.** सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२४०७१२१४४५१८२२१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**( दिपक पोकळे )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत:-**

१. मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य, यांचे सचिव राजभवन, मुंबई.

२. मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, विधानमंडळ, मुंबई.
३. मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, विधानमंडळ, मुंबई.
४. मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. उप मुख्यमंत्री (गृह), मंत्रालय, मुंबई
६. मा. उप मुख्यमंत्री (वित्त व नियोजन), मंत्रालय, मुंबई
७. मा. मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
८. सर्व मा.मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
९. सर्व सन्माननीय विधीमंडळ सदस्य, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
१०. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, यांचे सचिव राजभवन,मुंबई
११. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. प्रधान सचिव, विधानमंडळ, मुंबई.
१३. विकास आयुक्त, असंघटीत कामगार, मुंबई.
१४. कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१५. सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई.
१६. निवड नस्ती (कामगार-७)

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

**एच.एस.सी.सी. (इंडिया) लिमिटेड (भारत सरकार उद्योग) या संस्थेमार्फत "तपासणी ते उपचार आरोग्य योजना" राबविणेकरीता जिल्हानिहाय तपशिल दर्शविणारे प्रपत्र**

| अ.क्र. | विभागाचे नाव | जिल्हयाचे नाव |
|---|---|---|
| ०१ | अमरावती | अकोला |
| ०२. | | अमरावती |
| ०३. | | अकोला |
| ०४ | | वाशिम |
| ०५. | | यवतमाळ |
| ०६. | छत्रपती संभाजीनगर | छत्रपती संभाजीनगर |
| ०७. | | बीड |
| ०८. | | हिंगोली |
| ०९. | | जालना |
| १०. | | लातूर |
| ११. | | नांदेड |
| १२. | | धाराशिव |
| १३ | | परभणी |
| १४. | पुणे | इचलकरंजी |
| १५. | | कोल्हापूर |
| १६. | | पुणे |
| १७. | | सांगली |
| १८. | | सातारा |
| १९. | | सोलापूर |